# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३०/०३/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३०/०३/२००५ रोजी सभा सुचना क्र. २८ दि. २४/०३/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ९) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १०) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| ११) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १२) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १३) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १४) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सदस्यांचे हार्दिक स्वागत करतो. भारतीय संस्कृतीप्रमाणे होळी या सणाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. सचिवांनी सभा सुरु करावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, माझी एक तक्रार आहे. सभा सुरु होण्यापुर्वी त्यादिवशी जे नगरपालिकेमध्ये झाले, नगरसेवकांना ठेकेदारांनी बाहेर काढले ह्याच्याविषयी आपण आम्हाला सविस्तर माहिती द्या.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७१ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्हाला या विषयाचे विश्लेषण मिळेल का? सभापती साहेब, हा प्रकार का घडला ह्याची आम्हाला माहिती मिळेल का?

**गजानन भोईर :-**

आपण त्यांना होय किंवा नाही असे उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

सदस्या विषय झाल्यानंतर ह्या विषयावर बोलतो.

**गजानन भोईर :-**

पण तुम्हाला त्याचे उत्तर दोन मिनिटामध्ये देता येईल.

**मा. सभापती :-**

विषय मांडलेला आहे. ह्या विषयावर मी बोलतो. मी, कुठे नाही बोलायचे म्हणुन बोललो का?

**गजानन भोईर :-**

असे आपले विषय किती मागे पडलेले आहे, कुठे सगळ्या विषयावर आपली चर्चा होते?

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा महत्त्वाचा विषय आहे. ह्याच्यामध्ये महानगरपालिकचे नुकसान आहे. आपण आम्हाला ह्या विषयाचे पहिले सविस्तर सांगा की, काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

पंधरा लाखाचा फायदा झाला ना!

**जोजफ घोन्सालवीस :-**

काय फायदा झाला, कसला नगरपालिकेचा आर्थिक फायदा झाला. ह्या ठेकेदाराची जर एवढी दादागिरी चालत असेल, साहेब आम्हाला ह्याची माहिती मिळेल का?

**मा. सभापती :-**

मी, ह्या विषयानंतर तुम्हाला ह्याची माहिती देईन.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आपण सर्वसर्वे आहात ह्या सभागृहाचे आणि आपल्या आदेशाचे पालन करायचे हे सभासदांचे कर्तव्य आहे हे आम्ही मान्य करतो. पण एखादा सभासद पोटतिडकीने म्हणजे तो त्याच्या घराचा विषय त्याने आणलेला नाही, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये घडलेला विषय आहे. कारण मी महिला नगरसेविका असुन मी काल चौथ्या माळ्यावर गेली होती आणि चार ठेकेदारांनी, मला परवा कोणाचा फोन आला की, हे लोक फॉर्म भरायला देत नाही. तेव्हा मी चौथ्या माळ्यावर चार ठेकेदारांना घेऊन गेली तेव्हा माझ्या अंगावर सर्व ठेकेदार आले की, मॅडम, ऐसा क्यों करते अगर फॉर्म भरनेका नही तो, हम नही भरते। तो बोला, आपने जब लिया तब हमने आपको अटकाया नही। तो यह लोग भर रहे है, तो क्यु अटका रहे हो? मैने कम से कम पाच घंटा खडा रहकर चारसौ लोगो का फॉर्म बाटने को लगाया। तो यह जो दादागिरी ठेकेदार के युनियन की यहाँपर चल रही है, और आप स्थायी समिति के अध्यक्ष है और यह सारे टेंडर आपके सभा मे आते है। आर्थिक मंजुरी आपके इसमे आती है और जब आप ऐसे बोलेंगे की, यह विषय होने दो, तो हम यह बाजार लिलाव का विषय होने देंगे। लेकिन कभी अगर जब सभासद इतना बोलते है तो, मुझे ऐसा लगता है की, आपके अंदर इतना धीरज होना चाहिए। आपका विषय तो हम करके दे रहे है। लेकिन, आपके अंदर भी इतना धीरज होना चाहिए। ठिक है आप पाच मिनिट मे उसका जवाब दे दिजीए।

**गजानन भोईर :-**

सभेला अजुन पाच मिनिट उशीर होईल अजुन काय होईल.

**मा. सभापती :-**

उस विषय पर आप लोंगो को चर्चा करने की है, यह विषय हो जाने दो, बाद मे इसमे चर्चा करनेके लिए वक्त देता हुँ।

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण हा विषय जर पहिल्यांदा घेतला तर काय होईल.

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला रुलिंग दिले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभा सुरु झाल्यानंतर घ्या ना!

**गजानन भोईर :-**

सभा सुरु झाल्यानंतर घेतो ना, असे बोला.

**मा. सभापती :-**

तुम्हाला मी बोलतो.

**गजानन भोईर :-**

ते आपण नंतर बोललात.

**मा. सभापती :-**

मॅडम बोलायच्या अगोदर मी बोललो.

**गजानन भोईर :-**

तुम्ही हा शब्द नंतर वापरला.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य यात आपला गैरसमज होत आहे. सभापती साहेब बोलले की, हा विषय होऊ द्या.

**गजानन भोईर :-**

ते काय बोलले, सचिव तुम्ही सभा चालु करा आणि नंतर बोलले. पण हे पहिले करु शकले असते, सचिवांना सांगितले सभा चालू करा, पण त्यांना थांबवु शकले असते.

**रिटा शाह :-**

हा पहिला विषय संपू दे, नंतर त्या विषयावर चर्चा करु.

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला असे बोललो की, ह्या विषयावर नंतर बोलू या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठिक आहे.

**कैलासबेन जानी :-**

सभागृह नेत्यालाही त्याने बाहेर काढले म्हणजे काय?

**मा. सभापती :-**

सदरच्या विषयाला सुरुवात करावी.

**विजय पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, सन २००५-०६ चे बाजार लिलाव आपण मागवले होते. याची जाहिरात १५/०३/०५ च्या दैनिक वृत्तपत्रात दिली होती, त्या अनुषंगाने आपल्याकडे भाईंदर पुर्वेकरीता एकुण सहा निविदा आल्या होत्या आणि भाईंदर पुर्वची देकार रक्कम सत्त्याऐंशी लाख रुपये ठरवली होती. श्री. संदीप विश्वनाथ सावंत ह्याने सत्त्याऐंशी लाख पन्नास हजाराने निविदा भरली होती. श्री. प्रेमकुमार चव्हाण ह्यांनी बावन्न लाख दहा हजार एकशे एकने रक्कम भरली होती.

**अशोक पाटील :-**

आम्हाला दिलेल्या गोषवाऱ्यात ते आहे, ते आपण कशाला वाचून दाखविता? कुठच्या दैनिकामध्ये, कुठच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध केले होते?

**विजय पाटील :-**

मुंबई सकाळ, नवशक्तिमध्ये दिले होते.

**अशोक पाटील :-**

ते आपण ह्याच्यात लिहिले नाही.

**विजय पाटील :-**

नाही, ह्याच्यात दिले नाही.

**कैलासबेन जानी :-**

गेल्या वर्षाच्या निविदेची माहिती दिली असती, तर बरे झाले असते.

**गजानन भोईर :-**

गेल्या वर्षाची निविदा कितीला गेली होती, ह्याचा तुम्ही उल्लेख केला आहे का? भाईंदर पश्चिम, पुर्व, मिरा रोडला कितीने दिले होते?

**विजय पाटील :-**

तसा उल्लेख केला नाही, पण मी तुम्हाला माहिती देतो.

**कैलासबेन जानी :-**

तसा उल्लेख करायला पाहिजे.

**विजय पाटील :-**

श्री. पॅट्रिक जोजफ रॉड्रीक्स यांची गेल्या वर्षाची रक्कम पन्नास लाख त्र्यान्नव हजार इतकी होती.

**गजानन भोईर :-**

हे गोषवाऱ्यामध्ये दिले आहे का?

**रिटा शाह :-**

भाईंदर पूर्व विभागाचे किती गेले होते?

**विजय पाटील :-**

गेल्यावर्षी पन्नास लाख त्र्यान्नव हजारामध्ये गेली होती आणि श्री. जयदेव रामचंद्र किणी ह्यांची पन्नास लाख ८१ हजाराने गेली होती. श्री. देवीदास जयदेव किणी ह्यांची २६ लाख सतरा हजाराने गेली होती. श्री. परसी फनसेका उत्तन विभाग चार लाख ८५ हजाराने गेली होती.

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याच्यामध्ये ज्या माणसाने ८७ लाख ५० हजाराने जी निविदा भरली आहे तर गेल्यावर्षी काहीतरी ५० लाख रुपये होते असे मला वाटते.

**विजय पाटील :-**

५० लाख ८१ हजार रुपये.

**रिटा शाह :-**

५० लाख ८१ हजाराला जर ती निविदा गेल्यावर्षी गेली होती आणि एका वर्षात तीस लाखाचा फरक भरुन तो माणुस निविदा भरतो. त्याच्यावरुन समजुन येते की, त्या माणसाला एखादा वेळ कोणीतरी सेटींग करुन पाठवले की, एवढे जाऊन भर आणि नंतर त्याला समजावले की, गेल्यावेळी पन्नास लाखाला मिळाले आणि तु आता कशाला सत्त्याऐंशी लाख रुपये भरतो आणि कशाला उघडकीस आणतो की, तीस लाखाचा फायदा आहे, म्हणुन तो मागे घेत असेल , त्याचा अर्थ असा होत आहे. म्हणुन अशा माणसाला ज्याने असे भरले आहे त्यांनी जी अनामत रक्कम भरली आहे. ती जप्त करायची आणि त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**गजानन भोईर :-**

महापालिकेतर्फे त्यांच्यावर कार्यवाही करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ज्यांनी को-या निविदा टाकल्या आहेत त्यांचे काय?

**गजानन भोईर :-**

परत त्यांनी टेंडर फॉर्म भरलेले आहे, हे आमच्या निर्दशनात आले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याच्यापुढे त्यांना टेंडर फॉर्म देता कामा नये.

**विजय पाटील :-**

आपण भाईंदर पोलीस स्टेशनला त्याच्याबद्दल गुन्हा दाखल करावा म्हणुन पत्र दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

विजय पाटील ह्याच्यामध्ये मी तुम्हाला सांगते की, तुम्ही टेंडर फॉर्ममध्ये कंपनी बघुन हे करतात आणि ज्या माणसाला तुम्ही ब्लॅक लिस्टमध्ये टाकणार आहे, ते स्वतःच्या नावावर दुसरी कंपनी दुस-या नावाने चालू करणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्यामध्ये कंपनीचा उल्लेखच नाही.

**गजानन भोईर :-**

दुस-या नावाने ठेका घेईल आपण त्या कंपनीलाही ब्लॅक लिस्टमध्ये टाका. त्याला ही ठेका द्यायचा नाही.

**रिटा शाह :-**

आम्ही तुम्हाला तसे प्रुफ देऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण ह्याच्यामध्ये कंपनीचा उल्लेख नाही. फक्त नावाचा उल्लेख केलेला आहे. तो ठेका दुस-या कंपनीच्या नावाने घेऊ शकतो.

**विजय पाटील :-**

त्याने वैयक्तिक नावाने टेंडर भरलेला आहे. श्री. संदिप विश्वनाथ सावंत ह्या नावाने त्याने टेंडर भरलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. संदिप विश्वनाथ सावंत ह्याची कंपनी असेल आणि तो कंपनीच्या नावाने टेंडर घेईल ना!

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. संदिप सावंत, जयदेव किणी, ललित राणे, सायमन अल्मेडा ह्यांचे नाव आहे.  कंपनीचे नाव कुठे आहे?

**मा. सभापती :-**

हॉकर्सची जी टेंडर आहेत, ती वैयक्तिक नावाने चालतात.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, हे हॉकर्सचे टेंडर चालले आहे की, मार्केटचे चालले आहे?

**मा. सभापती :-**
हॉकर्स, फेरीवाले.
**रिटा शाह :-**
फेरीवाले दत्तक घेणार आहात का, मग आपण हॉकर्स कसे बोलता?
**जोजफ घोन्सालवीस :-**
आपण पहिल्यांदा फेरीवाले, ना-फेरीवाला झोन घोषित केलेला नाही.
**रिटा शाह :-**
आपण फेरीवाल्याचे टेंडर काढतो की, मार्केटचे टेंडर काढतो.
**विजय पाटील :-**
हे बाजार फी वसुलीचे टेंडर आहे.
**मा. सभापती :-**
आपण बाजार फी चे करत आहोत पण जे फेरीवाले आहेत.
**रिटा शाह :-**
साहेब, आपण मला उत्तर द्या की, तुम्ही मार्केटचे टेंडर काढुन घेतात की, काय करतात?
**जोजफ घोन्सालवीस :-**
फेरीवाल्याकडुन ही बाजार फी वसुल केली जाते.
**विजय पाटील :-**
मार्केटचे टेंडर काढतात.
**रिटा शाह :-**
मार्केटचे आहे, मग त्याच्यात हॉकर्स कसे आले?
**कैलासबेन जानी :-**
फेरीवाला झोन आहे तिथे आपण बोर्ड लावा. तिथे ब-याच भानगडी होतात. त्याची गाडी उचलुन घेऊन जातात.
**अशोक पाटील :-**
सभापती महोदय, ही जी निविदा बाजार लिलावाची मंजुरीसाठी ठेवली आहे. ह्याच्यामध्ये जी पहिली निविदा आहे. ८७ लाखाची ती एका ठेकेदाराने ८७ लाख ५० हजार रुपयाची निविदा नियमाप्रमाणे भरली होती. म्हणजे आपला जो देकार होता तो ८७ लाखाचा होता आणि त्याने जी निविदा भरली त्यात ५० हजार रुपये अबव्ह भरले होते. म्हणजे ती निविदा नियमाप्रमाणे बरोबर होती आणि त्याने त्यानंतर प्रत्यक्ष ती निविदा उघडल्यानंतर त्याने तो ठेका घेण्यास मनाई केली.
**प्रेमनाथ पाटील :-**
दुस-या दिवशी मनाई केली.
**अशोक पाटील :-**
त्याने मनाई केली आणि तुम्ही असे टिपणीमध्ये लिहिता की, त्याच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे.
**प्रभात पाटील :-**
गुन्हा दाखल केला नाही, पत्र दिले आहे.
**विजय पाटील :-**
पत्र दिले आहे आणि पोलिस स्टेशनमधुनही पत्र आलेले आहे.
**प्रेमनाथ पाटील :-**
गुन्हा दाखल करण्यासाठी कार्यवाही चालु आहे. आपण जे पोलिस स्टेशनमधुन पत्र आले आहे. त्याचे वाचन करा.
**विजय पाटील :-**
पोलीस स्टेशनमधुन माहिती मागवण्यांत आली आहे.
(श्री. विजय पाटील ह्यांनी सभागृहात पत्राचे वाचन करण्यांत आले.)
**रिटा शाह :-**
साहेब, ह्याचा अर्थ असा आहे की, पोलीस स्टेशनने जे मागितले आहे. त्याची माहिती आपण सभागृहाला द्या. त्या माणसाने असे केल्यावर तुम्ही त्याच्यावर काय कायदेशीर कार्यवाही करणार आहात?

**प्रेमनाथ पाटील :-**

पोलीस स्टेशनने चक्क दिले आहे की, नगरपालिकेची काय प्रोसीजर आहे.

**रिटा शाह :-**

तुमची प्रोसीजर काय आहे, तुमची अटीशर्ती काय आहे, कायद्यात काय आहे ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या कायद्यात काय आहे?

**गजानन भोईर :-**

ह्या पत्राचे उत्तर पोलीस स्टेशनला देण्यांत आले आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

पोलीस स्टेशनकडुन आपल्याला विचारण्यांत आले आहे.

**गजानन भोईर :-**

त्यांनी अधिकाराबाबत विचारले आहे. तर ते कागदपत्र आपण पोहचवली का?

**विजय पाटील :-**

हे पत्र आपल्याकडे कालच आले आहे.

**रिटा शाह :-**

ते पत्र काल येऊ द्या. पण तुम्हाला माहित असेल ना. त्यांच्या पत्राच्या अन्वये आम्ही तुम्हाला विचारतो की, आपल्या कायद्यात काय बोलते? जर कोणी अशी निविदा कॅन्सल केली तर तुम्ही कायद्याच्या हिशोबाने काय करणार आहात त्याची माहिती आम्हाला द्या.

**अशोक पाटील :-**

उपायुक्त साहेब, या पत्राच्या अनुषंगाने ज्याने महानगरपालिकेबरोबर चारसोबीसी केली आहे, तर त्याच्यावर आपण कायद्याने काय कार्यवाही करु शकतो, आपल्याकडे तशी काय तरतुद आहे असे आपल्याला पोलिसांनी विचारले आहे.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, आपण एवढे मोठे टेंडर काढतो. कोणीही रस्त्यावरचा सोम्या-गोम्या हे टेंडर भरणार आज ज्या माणसाची लायकी नाही, तो माणुस त्या ठिकाणी राहतो किंवा नाही ते आपल्याकडुन तपासले जात नाही. आज त्याची लायकी आहे का ८७ लाख रुपये तो आपल्याला देऊ शकेल? त्याची आपल्याकडे बँक गॅरंटी आहे का? त्याचे पॅनकार्ड नंबर पाहिजे. तसे तुम्ही ह्याच्यात लिहुन घ्या आणि जो पॅनकार्ड नंबर असेल त्यालाच तुम्ही अधिकार द्या की, तो टेंडर भरु शकेल आणि कोणीसुद्धा रस्त्यावरचा माणुस टेंडर भरतो. नगरपालिकेला काहीच नाही. कायदाकानुन आहे की, नाही?

**रिटा शाह :-**

हा नंतरचा भाग आहे. आपण नंतर त्याच्यावर सल्ला देऊ की, काय करायचे आहे?

**मिलन पाटील :-**

कोणतेही टेंडर असेल त्याच्यामध्ये पॅनकार्ड नंबर पाहिजे, त्याच माणसाला तुम्ही अधिकार द्यायचे आणि त्याचा रहिवाशी दाखला पाहिजे. म्हणजे तो ज्या ठिकाणी ऑफीस असेल, त्या ऑफिसचा त्याने आपल्याला प्रुफ द्यावा. कोणीपण सांगेल की, मी अमुक वॉर्डमध्ये राहतो, अमुक बिल्डिंगमध्ये राहतो. पण राहतो का नाही, हे कुणी बघितले आहे.

**अशोक पाटील :-**

मिलन पाटील साहेब, अटीशर्ती काय आहेत हे मला समजु दे.

**रिटा शाह :-**

मिलन पाटील साहेब, जे बोलतात ते मला मान्य आहे ती नंतरची गोष्ट आहे. पहिल्यांदा आपण हा जो विषय आणला त्या अंतर्गत तुम्ही काय कायदेशीर कार्यवाही करणार? ॲज पर अग्रीमेंट.

**अशोक पाटील :-**

उपायुक्त साहेब, याबाबत महानगरपालिकेच्या काय अटीशर्ती आहेत, त्या वाचून दाखवा.

**मिलन पाटील :-**

तसेच दुसरी गोष्ट की, को-या निविदा टाकतात. को-या निविदा म्हणजे काय चेष्टा चालू आहे का? को-या निविदा टाकतात ते तुम्हाला कळत नाही, तुम्ही फॉर्म भरता तर.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, अटीशर्तीचे वाचन करुन दाखविण्यांत यावे.

(श्री. विजय पाटील ह्यांनी सभागृहात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बाजार लिलावाच्या अटीशर्तीचे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याच्यामध्ये तुमच्या ज्या शर्ती आहेत त्यात कुठेही उल्लेख नाही की, तुम्ही टेंडर घेतल्यावर, फायनल झाल्यानंतर तुम्ही जर कॅन्सल केले तर तुमच्यावर कार्यवाही करणार असे अटीशर्तीमध्ये नाही. तुम्ही त्याच्यावर काय कार्यवाही करणार.

**अशोक पाटील :-**

साहेब, जोपर्यंत ठेकेदाराच्या लायकीबद्दल त्याच्या योग्यतेबद्दल तुमच्या काहीच अटी नाहीत. एखाद्या ठेकेदाराने जर समजा बाजार लिलावाची रक्कम ठप्प केली तर तुम्ही त्याच्यावर कार्यवाही करणार. त्याच्याकडुन तुम्ही काय लिहुन घेता.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यावर पोलीस स्टेशन काहीच कार्यवाही करु शकणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या लोकांना पोलीस स्टेशनने विचारलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

तुमचा गुन्हा त्याच्यावर दाखल होऊ शकत नाही.

**गजानन भोईर :-**

अनामत रक्कम किती वेळेत घ्यायची आहे.

**विजय पाटील :-**

पहिल्यांदा चाळीस टक्के चोवीस तासात घ्यायची आहे आणि पंधरा टक्के जी अनामत रक्कम आहे, ते आपण करारनामा करताना ती पंधरा टक्के अनामत आपण घेतो आणि ती ३१/०३/०६ पर्यंत बिनव्याजी आपल्याकडे राहते. सिक्युरीटी म्हणुन.

**प्रभात पाटील :-**

हा सगळा पैशाचा भाग झाला. आपण गुन्हा दाखल करण्यासाठी आपला कायदा काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

गुन्हा दाखल करण्याठी, आपण त्याच्यावर काय कार्यवाही करणार? आपल्याकडे त्याची काय प्रोसीजर आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही त्याच्यावर काहीच करु शकत नाही.

**गजानन भोईर :-**

त्याने पुन्हा फॉर्म भरलेला आहे किंवा नाही त्याची आपण चौकशी करा. त्याने पुन्हा सहा महिन्याची पावती फाडलेली आहे.

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, आता ह्या ज्या अटीशर्ती वाचल्या ह्याच्यामध्ये आपला पैसा सुरक्षित राहिल. अशा काही अटी आहेत का? तर काहीच नाही.

**गजानन भोईर :-**

त्या ठेकेदाराने मला परवडत नाही म्हणुन ठेका मागे घेतला आहे असे त्याने लेखी दिले आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण आधी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचा विचार करा. त्याच्यावर गुन्हा दाखल होऊच शकत नाही. कारण अटीशर्तीमध्ये तसे काहीच नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकत नाही. अटीशर्तीमध्ये तसे काहीच नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

अटीशर्ती काय आहेत ते आपण पहिल्यांदा दाखवा.

**गजानन भोईर :-**

महानगरपालिकेने त्याचे अजुन काहीच केले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

अटीशर्ती नाहीच आहे. त्यामुळे ते काहीच करु शकत नाही. ह्याच्यात काहीच नाही. त्यामुळे हे लोक त्याच्यावर गुन्हा दाखल करु शकत नाही.

**रिटा शाह :-**

त्याच्यावर तुम्ही गुन्हा दाखल कसल्या बेसवर करणार आहात?

**मिलन पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण जी पैशाची सिक्युरिटी घेतो. उद्या समजा, तीन महिन्याची मुदत आहे. त्याचे भरपुर पैसा वसुल केला व तीन महिने त्याने तुमचे पैसे दिले नाही त्यची अनामत ही त्याने काढुन घेतली आणि उद्या जर त्याने पुढचा बाजार केला आणि त्याच्याकडे खुप पैसे आले. त्याने तुमचे पैसे भरले नाही. तुम्ही त्याचे काय कराल. तुम्ही त्याची जप्ती कराल? आपल्याकडे प्रोव्हीजन काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे प्रोव्हीजन काय, तर काहीच नाही.

**मिलन पाटील :-**

तुमच्याकडे तेवढ्या रक्कमेची त्याची बँक गॅरंटी आहे का? तुम्ही काय सिक्युरिटी देणार?

**कैलासबेन जानी :-**

पहिल्याचा ज्याने ठेका घेतला होता त्याची काही थकबाकी बाकी आहे का?

**विजय पाटील :-**

थकबाकी बाकी नाही.

**कैलासबेन जानी :-**

कोणाचीच नाही, जसे उत्तन, काशि मिरा व मिरा रोड

**प्रभात पाटील :-**

आपण विषय डायव्हर्ट करु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता जे पत्र आले आहे त्याबाबत काय करायचे आहे?

**अशोक पाटील :-**

पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करणे संदर्भात आपणाकडे काय आहे?

**प्रभात पाटील :-**

आपण कशावर गुन्हा दाखल करु शकतो? ह्या अटीशर्ती कोणी बनवल्या आहेत?

**विजय पाटील :-**

आम्ही बनवल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही बनवल्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पोलीस स्टेशनला कुठल्या आधारावर पत्र दिले.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या अटीशर्ती ठेकेदाराच्या फेवरमध्ये आहे.

**विजय पाटील :-**

सभापती साहेब, मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, बंद निविदांमध्ये ह्यावर्षी पासुनच आपण टेंडर मागवायला सुरुवात केले होते. गेल्या वर्षापर्यंत सर्व सन्मा. स्थायी सदस्यांसमोर खुला बाजार लिलाव व्हायचा.

**प्रभात पाटील :-**

खुला बाजार लिलाव होत असेल किंवा बंद निविदा असेल पण आपल्याकडे अटीशर्तीमध्ये काय आहे.

**अशोक पाटील :-**

निविदा बंद किंवा खुला असु दे, पण जे ठेकेदार टेंडर भरतात त्यांची तुम्ही काय लायबिलीटी बघता, त्यांची सिक्युरीटी काय बघता? त्याच्या संदर्भात काय आहे.

**प्रभात पाटील :-**

त्या संदर्भात आपण काहीच केले नाही.

**अशोक पाटील :-**

बोली पद्धतीने किंवा बंद टेंडर येऊन तो प्रश्न वेगळा आहे.

**विजय पाटील :-**

पंधरा टक्के अनामत घेतो.

**मा. सभापती :-**

अशा पद्धतीने आपण जे लिलाव केलेले आहेत. त्याच्यामध्ये असे बुडित गेलेले किती उदाहरणे आहेत.

**विजय पाटील :-**

बुडित गेलेले असे कोणतेही नाही.

**मा. सभापती :-**

आपण असे जे लिलाव आजपर्यंत करत आलेलो आहोत, ज्या पद्धतीने आपण सुचना मांडल्या त्या सुचनाप्रमाणे यापुर्वी एकही टेंडर धारकाने बुडित रक्कम केली आहे असा अनुभव महानगरपालिकेला, नगरपालिकेला नाही.

**मिलन पाटील :-**

म्हणुन आपण प्रीकॉशन घ्यायचे नाही का? आज जे घडले निविदा भरली आणि तो मागे झाला याबाबत आपण पुढे प्रिकॉशन घेतले पाहिजे का नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सर्व सभासदांना मी सांगु इच्छितो की, निविदा भरणाऱ्याची अनामत रक्कम आपल्याकडे तीन महिने जमा असते व ती बुडु शकत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्त्वाचा मुद्दा तो नाही, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, कुठलाही एक ठेकेदार जो ठेका घेता. ठेका घेतल्यानंतर चोवीस तासात त्याला वाटले की, मला ठेका घ्यायचा नाही आणि तो तुम्हाला पत्र लिहितो की, मला हा ठेका घ्यायचा नाही तो तुम्ही रद्द करा. मग त्याच्यामध्ये एक प्रशासकीय अधिकारी म्हणुन आपण उत्तर द्या की, असे कोणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रोसीजरमध्ये त्याने आपल्याशी खेळ केले हे आपण समजुन घेऊ. पण आपल्या कायद्यात काय तरतुद आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

अन्यथा प्रत्येक ठेकेदार हा असाच करील.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे त्यांची अनामत रक्कम असते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण पोलिस स्टेशनला पत्र दिले आहे की, त्याच्यावर पोलीस कार्यवाही करा आणि पोलीसांनी ह्यांच्याकडे अटीशर्ती मागितल्या, त्या अटीशर्तीमध्ये असा कुठेच उल्लेख नाही. त्याने एकदा टेंडर घेतले आणि त्याने ते स्विकारायला नकार दिला म्हणुन त्याच्यावर पोलीस कार्यवाही होईल असे कुठेच अटीशर्तीत नाही. मग कुठल्या आधारावर तुम्ही पोलीस तक्रार करणार आहात.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य जे बोलत आहे ते एक्झॅक्टली माझेही बोलणे आहे. फक्त माझा प्रश्न असा आहे की, तुमच्या अटीशर्तीमध्ये कुठेही दिसत नाही ते तुम्ही वाचलेले आहे. पण मी असा मुद्दा उपस्थित करते की, असे तुमच्या प्रशासनामध्ये कुठले क्लॉज असेल, असे कोणी छळ केला, टेंडर भरुन मागे घेतले त्याच्यावर काहीतरी कायदेशीर कार्यवाही करण्याचे असे असेल, त्याबद्दल प्रशासनाने माहिती द्या.

**मा. सभापती :-**

टेंडर घेतल्यांनतर त्याची जी अनामत रक्कम असते, त्याचे तुम्ही ॲग्रीमेंट करता की नाही. ८७ हजार रुपये भरल्यानंतर त्याची अनामत रक्कम आपल्याकडे जमा राहते. तीन महिन्याची डिपॉझिट चालू केल्यावर होते. या झाल्या ज्या आपल्या अटीशर्ती आहेत. त्याच्यानंतर टेंडर एखादे टेंडरधारकाने घेतल्यानंतर त्याचे ॲग्रीमेंट केले जाईल आणि ॲग्रीमेंटमध्ये ह्या ज्या शर्ती आहेत त्या आपण टाकाव्यात. जेणेकरुन आपण अशापद्धतीने ठेका घेतला नाही किंवा पैशाची भरणा केली नाही. तर आपल्यावर पोलीस केस होऊन जाईल किंवा अन्य जी आपली रक्कम असेल ती जप्त केली जाईल. अशाप्रकारचे ॲग्रीमेंट आपण करावे आणि त्या ॲग्रीमेंटनुसार आपण ते काम करावे. ह्या फक्त अटीशर्ती आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाहीतरी, ती रक्कम आपल्याकडे जमा झाली आहे.

**मा. सभापती :-**

ही रक्कम जमा झाली.

**प्रेमनाथ पाटील :-**

८७ लाखापेक्षा कमी रक्कमेची निविदा येणार, तर तुम्ही काय कराल?

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याकडे रक्कम जमा झाली तो प्रश्न नाही. आपल्याकडे अनामत रक्कम म्हणजे त्याने आगाऊ जी रक्कम अजुन भरलेली नसणार. त्याने तो टेंडर एक्सेप्ट केलेले नाही. मग त्यातल्या त्यात त्याची अनामत रक्कम आपल्याकडे जमा आहे. परंतु प्रशासनाचा वेळ आणि मेहनत त्याने वाया घालवली त्या संदर्भात त्या ठेकेदारावर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. त्याबाबत आपल्याकडे काय अटीशर्ती आहेत?

**मा. सभापती :-**

त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी कंडीशन नसतात.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्याची अनामत रक्कम जमा होते.

**मा. सभापती :-**

त्याची अनामत रक्कम आपल्याकडे जमा होईल आणि त्याच्यावर पोलीस कार्यवाही होईल.

**प्रभात पाटील :-**

पोलीस कार्यवाही कशी होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

पोलीसांनी विचारले आहे की, तुमच्या अटीशर्ती काय आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिकेला पोलीस स्टेशनने पत्र देऊन विचारले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पोलीस स्टेशनने आपल्याला विचारले आहे की, आपल्या कंडीशन काय आहेत?

**कैलासबेन जानी :-**

अटीशर्तीमध्येच तसे काहीच नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे अटीशर्ती नाहीच आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब विधी सल्लागार आहेत. त्यांना बोलवा. त्यांना विचारा ते आपल्या कुठल्या कामकाजाकरीता येतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पोलीस तक्रार करण्याआधी त्यांनी सभा घ्यायला पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

सचिवजी, विधी सल्लागारांना बोलवण्यांत यावे.

**गजानन भोईर :-**

आपण त्यांना पगार देतो, कसला पगार देतो? मानधन देतो ते आपण त्यांना कुठल्या कामासाठी देतो?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी ते आल्यानंतर हा खुलासा करु आणि त्यांना पगार काय देतो, काय करतो. हा विषय नंतरचा आहे.

**गजानन भोईर :-**

आपण त्यांना सभागृहात बोलवा.

**मा. सभापती :-**

आपण बोलल्यानंतर मी सचिवांना विधी सल्लागारांना बोलवा. मला सांगितले आणि त्यांना बोलवायला सांगितल्यानंतर आपण ही भाषा सुरु केली.

**गजानन भोईर :-**

त्याची दुरुस्ती करतो. पहिल्यापासुन आपण सांगितले आहे, प्रत्येक स्थायी समितीच्या सभेत अधिका-यांनी बसायला पाहिजे. हे सदस्यांनी किती वेळा सांगून झाले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे सभागृहात का येत नाही?

**मा. सभापती :-**

ज्या विभागाचा विषय असेल ते अधिकारी असतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

विधी सल्लागार आहेत, ते येथे पाहिजेत ना!

**मिलन पाटील :-**

विजय पाटील, माझे असे म्हणणे आहे की त्या ठेकेदाराने महानगरपालिकेची फसवणुक केली आहे म्हणुन कायद्यामध्ये ४२० ची प्रोव्हीजन आहे.

**रिटा शाह :-**

कायद्यामध्ये काय आहे ते सांगा.

**मिलन पाटील :-**

कायद्यामध्येच प्रोव्हीजन आहे ४२० ची, त्याच्यामध्ये महानगरपालिकेने दिल्यानंतर ते पोलीसांचे काम आहे. ४२० चा गुन्हा दाखल करण्याचा.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याच्यावर ४२० चा कलम लावण्यांत यावा.

**मिलन पाटील :-**

कलम आहे. प्रोव्हीजन आहे तर हे पोलिसांचे काम आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असे जर असते तर पोलीसांनी आपल्याकडे पाठवलेच नसते. परत पत्र पाठवलेच नसते.

**मा. सभापती :-**

त्याच्यावर ४२० ची कार्यवाही करा हे तुम्ही सांगायची आवश्यकता नाही. अशा निविदा दिल्यानंतर त्याने आमची फसवणुक केली आहे. तर फसवणुकीचा कायदा तोच आहे.

**प्रभात पाटील :-**

म्हणुन, पोलीसांना आपली कारवाई करु द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

तसे आपल्याला पत्र दिले आहे. त्यात तसा उल्लेख आहे.

**मा. सभापती :-**

पोलीसांनी जरी पत्र दिले तरी ४२० हा कलम लागेल. पण ४२० च्या व्यतिरिक्त काय लावायचे असेल तर तुम्ही काय केलेले असेल ते त्यांनी माहिती मागितले. म्हणजे ४२० ची कार्यवाही करायला आपण त्यांना काय कमी ठेवले हा विषय नाही. ४२० ची कार्यवाही करा. ज्याने निविदा भरली आणि फसवणुक केली त्याच्यावर ४२० चा गुन्हा दाखल होईल.

**प्रभात पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये आपण स्थायी समितीचा ठराव असा करा आणि आयुक्त साहेबांना द्या. त्याने हा गुन्हा केलेला आणि ४२० केलेली आहे आणि तसे पोलीस स्टेशनला पत्र लिहुन कळवा की, ४२० झालेली आहे. तसा ठराव करा.

**मा. सभापती :-**

ठराव करण्याचा प्रश्न येतच नाही. कारण ४२० ही झालीच आहे.

**अशोक पाटील :-**

आपण ठराव केल्यानंतर कमिशनर साहेब कार्यवाही करतात का? आतापर्यंत केले आहे का?

**रिटा शाह :-**

एकभी काम नही होता.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, ह्या ज्या अटीशर्ती आहेत. त्या आपण बोर्डवर लावू शकतो का?

**मा. सभापती :-**

पण हे तुम्हाला बोलायची आवश्यकता काय आहे? तुम्ही पत्र ह्या आणि तुम्ही लिहुन द्या. तेही आपल्याला चालेल. मला वाटले, मला भाईंदर पूर्वेला लिहायचे आहे. मला हौस आहे तर ते मी लावू शकतो. ते ओपन आहे.

**मिलन पाटील :-**

पब्लिककरीता ते ओपन आहे ना!

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आता त्यांनी वाचून दाखवले की फलकावर अटीशर्ती असतील तसे त्यांनी वसूली करावी. पण एकातरी मंडईत फलक कुठे आहे, असेल तर आपण मला दाखवा.

**विजय पाटील :-**

साहेब, आपण मंडईमध्ये वसूली करत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मंडईमध्ये महानगरपालिकेचे बोर्ड आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

सकाळी आणि संध्याकाळी अशी दोन वेळा वसुली होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

दोन वेळा वसुली होते आणि आपल्याकडे एकाच वेळी वसुली करायची आहे असे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

एक वेळा पावती देतात आणि दुसऱ्या वेळी पावती देत नाही. ऑफिशियली आणि अनऑफिशियली अशी वसुली होते.

**विजय पाटील :-**

वसुली एकाच वेळी होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

दोन वेळा वसुली होते.

**सुर्यकांत भोईर :-**

दोन वेळा वसुली होते. सकाळी पावती देतात आणि संध्याकाळी पावती देत नाही.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब जसे सन्मा. सदस्य श्री. जोजफ घोन्सालवीस यांनी मुद्दा उचलला की, फलक लावण्याचे तर फलक लावण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. पण ते फलक लावत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेची फलक लावायची जबाबदार नाही. त्या ठेकेदाराने जर लावले नाही तर महानगरपालिकेने त्याच्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे आणि दुसरा मुद्दा आता जो मुद्दा उपस्थित झालेला आहे, त्याच्यामध्ये कायद्यामध्ये तजबीज आहे की, असा कोणी ठेका घेऊन नंतर लगेच रद्द केला तर त्याच्यावर काय कार्यवाही करायची हे कायद्यामध्ये आहे आणि राहिला विधी सल्लागारांचा मुद्दा तर विधी सल्लागाराला कुठलाही ठराविक विभाग नसतो. त्यांनी प्रत्येक सभेमध्ये येऊन बसायला पाहिजे कारण विधी सल्लागार हे फक्त एका विभागाकरीता निगडीत नसतो म्हणजे त्यांनी नेहमी येऊन बसायला पाहिजे. त्यांचा कुठलाही एक विभाग नसतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता. विजय पाटील ह्यांनी अटीशर्ती वाचून दाखवल्या त्याच्यामध्ये फलक नगरपालिकेचा आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, जसे विधी सल्लागारांनी, अशोककुमार रणखांब साहेब, प्रशासकीय अधिकारी म्हणुन येऊन बसतात तसे प्रत्येक मिटींगमध्ये येऊन त्यांनी बसायला पाहिजे. त्यांचा कूठलाही विभाग नसतो.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, विधी सल्लागार कोर्टात कामानिमित्ताने जातात त्याची ते आपल्याकडे नोंद करतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

नोंद करायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

आजपर्यंत पाच वेळा झाले ते कोर्टात केसला आहे. आज कुठली केस आहे. त्याची कल्पना दिली आहे का?

**रिटा शाह :-**

ते रिटायर पर्सन आहेत, त्यांना कोर्टात जायचा प्रश्नच कुठे येतो? ते रिटायर आहेत, ते कोर्टात कसे जाणार?

**गजानन भोईर :-**

महानगरपालिकेच्या कामासाठी गेले असतील, तर तशी त्यांनी नोंद केली आहे का?

**रिटा शाह :-**

करत नसतील. केव्हाच ते नसतात.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, तुमच्याकडुन आता विचारण्यांत आले तेव्हा समजले की, ते आज कोर्टात गेले आहे.

**मिलन पाटील :-**

आपले दुसरे वकील आहेत ना!

**गजानन भोईर :-**

कुठे आहेत, भाईंदरचा एकही वकील नाही.

**मा. सभापती :-**

येथे वकीलांना बोलावू का?

**मिलन पाटील :-**

तसे नाही, म्हणजे त्यांना जायला जरुरत नाही.

**मा. सभापती :-**

काही केस ते स्वतः हॅन्डल करतात.

**रिटा शाह :-**

ते जज्ज आहेत आणि वकील म्हणुन केस हॅन्डल करतात का?

**मा. सभापती :-**

पण सध्या तो विषय नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, विषय तसा नाही.

**मा. सभापती :-**

येथे आता विधी सल्लागार नाही म्हणुन तो विषय नको आहे. सध्या जो विषय आहे त्याच्यावर चर्चा करा.

**रिटा शाह :-**

त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही काय करणार, याबाबत प्रशासनाने उत्तर द्यावे.

**प्रभात पाटील :-**

विधी सल्लागार सभेत प्रत्येक वेळी नसतात.

**गजानन भोईर :-**

विधी सल्लागारांना स्थायी समितीच्या सभेत अजुन आपण पाहिलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

स्थायी समितीत ज्या विषयाला आपण त्यांना बोलावतो. त्यावेळी नेमके ते नसतात.

**गजानन भोईर :-**

मग ते जाणुनबुजुन येत नाही असे झाले.

**सुर्यकांत भोईर :-**

ठराव करा आणि हाकलुन लावा.

**गजानन भोईर :-**

विधी सल्लागार आपल्याला काहीच कामाला येत नाही.

**मा. सभापती :-**

विषय कुठला चालू आहे आणि आपण कुठल्या विषयावर  बोलत आहात, आपण अवांतर विषय येतात.

**गजानन भोईर :-**

आपण त्या ठेकेदारावर काय कार्यवाही करु शकतो हे कोणीच सांगू शकत नाही.

**मा. सभापती :-**

सचिवजी, आर्थिक नुकसान करणारा जर निविदाधारक असेल, त्याच्यावर १९४९ च्या अधिनियमामध्ये काय तरतुद आहे, त्याची माहिती द्या आणि ४२० चा कलम हा आहेच, तसेच जर आपण पोलीसांना सांगितले की ४२० चा गुन्हा दाखल करु नका तरी ते ४२० चा गुन्हा दाखल करणारच, नाही बोलणार नाही. ४२० हा कलम आहे.

**रिटा शाह :-**

महानगरपालिकेच्या कायद्यात काय तरतुद आहे ते सांगा.

**गजानन भोईर :-**

४२० हा कलम लावून आणखीन कोणते गुन्हे दाखल करता येईल ते सांगा.

**मिलन पाटील :-**

त्याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करु शकतो.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, विषयाला डायव्हर्ट न करता आपण बघा की, कायदेशीर कार्यवाही काय करु शकतो?

**सुर्यकांत भोईर :-**

जे को-या कागदावर निविदा भरतात त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यांत येईल?

**जोजफ घोन्सालवीस :-**

निविदा भरल्यानंतर त्याला पटत नाही. म्हणुन त्याने निविदा मागे घेतली, ४२० चा प्रश्न कुठे आला? त्याला ४२० म्हणता येणार नाही. त्याला पटत नाही म्हणुन त्याने निविदा मागे घेतली.

**रिटा शाह :-**

अटीशर्तीमध्ये कुठे दिसत नाही, पण महानगरपालिकेच्या कायद्यात काहीतरी तरतुद असेल ना!

**जोजफ घोन्सालवीस :-**

महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीचा तुमचा प्रश्न आहे. यात ४२० चा प्रश्न येत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी त्यालाच ४२० म्हणतात.

**गजानन भोईर :-**

४२० कलम पेक्षा आणि दुसरे जास्त कलम लावा. असे त्याचे म्हणणे आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, अजून चर्चा न करता आपल्या कायद्यात काय तरतुद आहे. असा जो प्रकार घडला त्याबाबत त्याचे उत्तर द्या. कोणालाही अडचणीत आणायचा आमचा कुठला प्रश्न नाही. असे जर काही घडले तर कायद्यात त्याच्यामध्ये १९४९, ५६, ५२, ५४ ह्याच्याखाली काय तरतुद आहे ते सांगा.

**अशोक पाटील :-**

विजय पाटील साहेब बारा वर्षाच्या कारकीर्दीत असे कधी घडले होते का? कधी कोणा ठेकेदाराने तुमचे पैसे बुडविले होते आणि त्याच्यावर तुम्ही कार्यवाही केली होती का?

**विजय पाटील :-**

नाही, असे झाले नाही.

**गजानन भोईर/ मिलन पाटील :-**

तसे झाले नाही.

**विजय पाटील :-**

मुंज म्हणुन ठेकेदार होते त्याने व्याजासह पैसे भरले होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे असे बुडवल्यानंतर आपली अट काय असते? आपण व्याजासह पैसे घ्यायचे असे असते का?

**केशव घरत :-**

विजय पाटील साहेब, श्री. सुर्वे होते त्यांनी पैसे बुडवले की नाही?

**विजय पाटील :-**

साहेब, सुर्वेची कोर्टात केस चालु आहे.

**अशोक पाटील :-**

विजय पाटील साहेब म्हणुन आता आपण बोध घेऊन अटीशर्तीमध्ये काय ते बदल करायला पाहिजे होते किंवा कमिशन साहेबांचे आदेश घ्यायला पाहिजे होते की, स्थायी समितीचे निर्देश घ्यायला पाहिजे होते असे प्रसंग उद्‌भवु नये म्हणून.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जे कायदे तज्ज्ञ आहेत. त्यांच्याकडुन अटीशर्ती बनवुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपण आपल्यावर आलेल्या प्रसंगातुनच शिकायचे असते, अगोदरच तुम्ही निविदा काढू नका. आता स्वयंपुर्ण व्हा, त्या अटीशर्तीमध्ये सुधारणा करुन फेर निविदा काढा. पुन्हा ह्याच पद्धतीने पुढे जाऊ नका.

**सुर्यकांत भोईर :-**

अटीशर्ती तयार करा आणि परत निविदा काढा.

**केशव घरत :-**

जर श्री. सुर्वे ह्यांच्यावर केस चालू आहे. पहिल्यांदा असा हा प्रकार घडलेला आहे. तर आपण अटीशर्तीमध्ये सुधारणा करायला पाहिजे.

**विजय पाटील :-**

श्री. सुर्वे ह्यांनी निविदा स्विकारली होती पण पैसे भरले नव्हते आणि ह्या ठेकेदारने निविदा स्विकारली पण पत्र देऊन निविदा मागे घेतली आहे.

**केशव घरत :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे त्याने पैसेसुद्धा वसुल केले आहे.

**विजय पाटील :-**

पैसे वसुल केले आहेत, पण भरणा केला नाही.

**केशव घरत :-**

माझ्या माहितीप्रमाणे, त्याने सब टेंडर दुसऱ्याला दिले त्यांच्याकडुन पैसे वसुल केले आणि त्याने स्वतःने पालिकेला पैसे भरलेले नाही.

**गजानन भोईर :-**

विषय तोच आहे ना!

**केशव घरत :-**

त्याच्यातुन धडा घ्यायला पाहिजे होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग ४२० लावा, ते बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

मघाशी लेखापाल ह्यांना सांगितले होते की, १९४९ अधिनियमामध्ये अशी कोणतीही तरतुद नाही. तर ४२० च्या कायद्याने त्याने आपली फसवणुक केली अशापद्धतीची आपण तक्रार नोंदवलेली आहे आणि ती तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांनी पुन्हा रिटर्न पत्र दिले तर रिटर्न पत्र द्यायचे कारण काय?

**सुर्यकांत भोईर :-**

अटीशर्ती काय आहेत ते दाखवा आणि पोलिसांनी पत्र काय दिले आहे ते दाखवा.

**गजानन भोईर :-**

प्रत्येक सदस्याला त्याची एक-एक प्रत द्या.

**मा. सभापती :-**

आपण जेव्हा त्या निविदाधारकाच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर पोलीस प्रशासनाकडुन त्याची माहिती मागवली जाते आणि ती माहिती त्यांनी मागितली होती. त्यांनी ती माहिती दिल्यानंतर जो ४२० चा गुन्हा आहे तो त्याच्यावर लावण्यांत येईल. विजय पाटील आपण त्यांना त्यापद्धतीने कळवावे की, आपण ती माहिती दिल्यानंतर ४२० च्या अन्वये त्याच्यावर गुन्हा नोंदवावा अशा पद्धतीचे पत्र आपण द्यावे.

**गजानन भोईर :-**

त्या ठेकेदारावर आपल्याला दोन कलम लावता येईल ४२० आणि ३५६ असे

**मा. सभापती :-**

याबाबत उपायुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब मला बोलायचे आहे कारण मी स्वतः ऐकलेले आहे, तुम्हाला वाईट वाटत असेल कारण आपणा दोघांचे डिस्कर्शन चालु होते ते मी ऐकले, बोलतात बोलतात तर म्हणे त्यांना बोलु दे कसे काय बोलतात ते कारण ते बोलले तर मला शिकायला भेटणार असे काहीतरी तुम्ही बोलले तर मला शिकायला भेटणार असे काहीतरी तुम्ही वक्तव्य केले. तर आम्ही बोंबलतो म्हणजे वेड्यासारखे बोंबलतो काय?

**मा. सभापती :-**

तुम्ही जे आता रेकॉर्डवर बोलता, तर मी हे असे रेकॉर्डवर बोललो नाही. आपण टेप वाजवुन बघा.

**रिटा शाह :-**

आपण रेकॉर्डवर बोलला नाही, आपला तो विषय चालला होता.

**मा. सभापती :-**

आपण असे कसे बोलता?

**रिटा शाह :-**

मी घाबरत नाही म्हणुन मी तुम्हाला बोलले.

**मा. सभापती :-**

तुम्ही घाबरता किंवा घाबरत नाही तो विषय कुठे आला? येथे घाबरायला कोण खायला आले आहे? की कोण कोणाला खातो?

**रिटा शाह :-**

मग तुम्ही असे कशाला बोलता, आमच्या समोर बोला ना!

**मा. सभापती :-**

तुम्हीच प्रश्न करता आणि तुम्हीच तुमच्या प्रश्नाचे निरसन करता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

महानगरपालिकेचे कलम १९४९ नुसार तो गुन्हा होऊ शकत नाही. आता आपण बोललात की १९४९ मध्ये तशी काही तरतुद नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.):-**

संबंधित ठेकेदाराने आपल्याकडे निविदा दाखल केल्यानंतर त्या निविदांच्या करारनाम्यानुसार त्याने ती अमान्य केली. त्याने ती निविदा घेण्यासाठी नकार दिला. मुळतः आतापर्यंत मिरा भाईंदर नगरपालिका असताना, नगरपालिकेची महानगरपालिका झाली असताना मी मागचे सगळे करारनामे तपासुन पाहिले, तर ह्याच पद्धतीने करारनामा आणि ह्याच पद्धतीने अटीशर्ती या ठिकाणी दिलेल्या आहेत. त्याच्यामुळे फेर बदल कुठल्याही प्रकारचा केलेला नाही. ही जी घटना झाली आहे त्या घटनेमध्ये त्या ठेकेदाराने आपल्याला रिफ्युज केलेले आहे की, जी रक्कम कोट केली त्याला घेण्यासाठी. त्यामुळे ही जी घटना आहे जसे सन्मा. सदस्यांनी सांगितले की ३५६ दाखल करा किंवा ४२० दाखल करा. तर ३५६ चा इंडियन पिनल कोडमध्ये असा अर्थ होतो की, त्याने फिजीकलरित्या शासकीय कामामध्ये अडथळा आणला. ३५६ नुसार त्याने कुठल्याही प्रकारे शारिरिक ऑब्स्टेकल किंवा प्रतिकार निर्माण करुन त्याने तसा कुठलाही प्रकार केला नाही. त्यामुळे ३५६ च्या तरतुदीमध्ये बसत नाही. दुसरी गोष्ट अशी की, महानगरपालिकेकडे नियम उपलब्ध असल्याने त्याने जे डिपोझिट भरले ते महानगरपालिकेने जप्त केले. ही महानगरपालिकेची पहिली स्टेप, दुसरी स्टेप अशी की, त्याने तितक्या रक्कम पर्यंत निविदा देकार देऊन त्याने ती निविदा घेण्याचे टाळले आहे. त्यामुळे आपली त्याच्यामध्ये फसवणुक झाली. ह्या दृष्टीकोनातुन पोलीस स्टेशनला आम्ही रितसर ऑफिशियली पत्र दिले आहे. ते पत्र दिल्यानंतर जर पोलिस स्टेशनला तुम्ही कोणतेही पत्र दिले तर ते डायरेक्टली कुठल्याही प्रकारचा गुन्हा नोंदवत नाही. त्या प्रकरणाची इत्यंभुत चौकशी करतात आणि चौकशी केल्यानंतर त्याचे जे कन्टेन्स आहे. त्याच्यामधल्या ज्या बाबी आहेत त्या पडताळुन त्याचा गुन्हा दाखल होतो. एफ.आय.आर. तर हा गुन्हा दाखल करण्यासाठी त्यांनी आपल्याकडे परत माहित मागितली की, ह्याच्यामध्ये काय काय झाले आहे. ह्या घटनेमुळे काय होऊ शकते आणि तुमच्याकडे काय काय तरतुद आहे. ह्याचे उत्तर देखील महानगरपालिकेने परत त्यांना पाठविलेले आहे.

**विजय पाटील :-**

साहेब, कालच पत्र आले आहे. त्यांना उत्तर पाठवायचे आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.):-**

ठिक आहे, पहिले पत्र दाखल केल्यानंतर त्यांनी दुसरे पत्र पाठवले आणि त्यांनी जे परत तिसऱ्यांदा पत्रात जे कनटेन्स विचारलेले आहे. ह्याची सविस्तर माहिती पोलीस स्टेशनला अति तात्काळ देण्यांत येण्याची व्यवस्था करण्यांत येईल, त्यानंतर पोलीस गुन्हा दाखल होईल किंवा न होईल त्याचे लिगल विधी सल्लागार आपल्याकडे आहेत. त्या अनुषंगाने आपण ती कार्यवाही करणार आहोत.

**रिटा शाह :-**

ते लिगल किंवा इललिगल होऊ शकते का नाही, हा प्रश्न तिथेच निर्माण झाला. आम्ही तोच प्रश्न विचारतो की तुम्ही ज्या अटीशर्ती सांगतात आणि त्याच्यावरुन दिसते की, त्याच्यावर कुठलाच गुन्हा नोंदवु शकत नाही कारण त्यांनी जेव्हा तुमच्याकडे अटीशर्तीची प्रत मागितली.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.):-**

मॅडम, तुम्ही असे विचारता त्याला उत्तर देऊ शकत नाही. म्हणुन मी सांगितले व रेकॉर्डिंग चालू आहे. त्यामुळे आम्हाला आपल्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. मी व्यवस्थित समजावुन सांगितले असते की, ते काय आहे.

**रिटा शाह :-**

समजावयाचे आहे तर रेकॉर्डिंग बंद करा आणि समजवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ह्या निविदा कुठल्या तारखेला किती वाजता ओपन केल्या.

**गजानन भोईर :-**

विजय पाटील साहेब, माझ्याही प्रश्नाचे उत्तर द्या की, आपले जे पेपरला परत निविदा देण्याचे जे आर्थिक नुकसान झाले आहे, ते आर्थिक नुकसान कोण सोसणार आहे?

**प्रभात पाटील :-**

सभागृहाला विनंती आहे की, एखाद्या सदस्यांनी प्रश्न विचारला तर त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळु द्या ना!

**गजानन भोईर :-**

पण प्रश्नाचे उत्तर मिळतच नाही.

**प्रभात पाटील :-**

यासाठी आपण स्वतःने शिस्त लावू या.

**प्रेमनाथ पाटील :-**

कुठल्या तारखेला आणि किती वाजता आपण निविदा ओपन केल्या.

**विजय पाटील :-**

२३/०३/२००५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता निविदा ओपन केली.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या ठेकेदाराने निविदा मागे घेतल्याचे आपल्याकडे पत्र केव्हा आले?

**विजय पाटील :-**

२४/०३/२००५ ला त्याने पत्र दिले.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला त्याचे पत्र किती वाजता आले? त्यात वेळेचा उल्लेख केला आहे का?

**विजय पाटील :-**

नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

का? कारण आपण २४ तासाच्या आतमध्ये आपण ४० टक्के घेऊ शकतो असे आहे.

**विजय पाटील :-**

निविदा मंजुरी नंतर आपण जेव्हा त्याला ऑर्डर देऊ व ऑर्डर दिल्यानंतर म्हणजे त्याला महानगरपालिकेतर्फे आदेश देऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण त्यांना आदेश किती दिवसानंतर देता.

**विजय पाटील :-**

ही जर ८७ लाख ५० हजाराची निविदा मंजुर झाली असती तर आपण त्याला एक तारखेला ऑर्डर दिली असती, आदेश दिला असता.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्याकडे आठ दिवस आहेत. म्हणजे तो त्या आठ दिवसामध्ये निविदा मागे घेऊ शकतो. २३ तारखेला निविदा काढल्या.

**विजय पाटील :-**

२३ तारखेला निविदा ओपन केल्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

२३ तारखेला निविदा ओपन केल्या व त्याला ऑर्डर आपण १ तारखेला देणार.

**विजय पाटील :-**

त्याने जर ती निविदा मागे घेतली नसती तर आपण त्याला १ तारखेला ऑर्डर दिली असती.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे त्याला आठ दिवसाचा अवधी मिळाला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग, आपण ही मुदत का ठेवता? निविदा मागे घ्यायला ही मुदत ठेवता का?

**विजय पाटील :-**

ह्या सर्व निविदा स्थायी समिती यायला पाहिजे आणि त्याला स्थायी समितीने मंजुरी द्यायला पाहिजे. स्थायी समितीच्या मंजुरी शिवाय आम्ही कशी काय ऑर्डर देणार?

**रिटा शाह :-**

एकंदरीत कायद्यामध्ये तरतुद काय आहे? तुम्ही टेंडर ओपन केले व ज्याला ते मिळाले तर तुम्ही किती तासात किती दिवसात त्यांना कळवतात की, तुमचे टेंडर मान्य झालेले आहे.

**विजय पाटील :-**

स्थायी समितीसमोर ह्या सगळ्या निविदा मंजुरीसाठी आणायला लागते.

**रिटा शाह :-**

त्याच्याकडे आठ दिवसाची मुदत होती, त्याला घ्यायचे की नाही घ्यायचे? त्याने आता तुम्हाला पत्र लिहिले की, मला हे टेंडर नको आहे. मग त्याने चिटींग काय केले आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

असा त्याचा अर्थ होतो. जेव्हा तुमची ऑर्डर मिळेल तेव्हाच.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**रिटा शाह :-**

असे आम्ही बोलणार नाही. जर त्याने चिटींग केली नाही तर आम्ही कशाला बोलणार त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**विजय पाटील :-**

त्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आले आहे.

**गजानन भोईर :-**

त्या ठेकेदाराने दुसऱ्या नावाने पावती फाडली. पाच मिनिटात मी सांगतो की, त्याच ठेकेदाराने पावती फाडलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला देऊ नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

निविदा ह्या ८७ लाखापेक्षा कमी करु नये.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य गजानन भोईर एवढ्या आत्मविश्वासाने बोलत आहेत की, पाच मिनिटामध्ये सांगतो की, त्याने दुसऱ्या नावाने पावती फाडली आहे. मघाशी सन्मा. सदस्य मिलन पाटील बोलले त्याच मुद्द्यावर मी येते, म्हणुनच अशा माणसाची सुरक्षा अनामत, त्याचा पत्ता, त्याचे रेशनकार्ड, त्याचे खरे नाव याबाबतीतले सर्व प्रुफ तुमच्याकडे असले पाहिजे. त्या माणसाचा फोटोसुद्धा असला पाहिजे. उदा. मी प्रभात पाटील आहे, मी रिटा शाह बनु शकते दुसऱ्या नावाने.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांच्याकडे पॅनकार्ड झेरॉक्स घेण्यांत यावी.

**अशोक पाटील :-**

पॅनकार्डाची झेरॉक्स घेण्यांत यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

८७ लाख म्हणजे तो एक करोडच्या घरात गेला म्हणजे त्यांच्याकडे आय. टी. प्रुफ पाहिजे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, त्याने मागची निविदा जी घेतली ती कुठल्या नावाने घेतली होती.

**विजय पाटील :-**

श्री. संदिप सावंत

**रिटा शाह :-**

श्री. संदिप सावंत म्हणुन, जर तुम्ही ह्या बद्दलची फेर निविदा काढणार असणार तेव्हा वैयक्तिक नावानेच काढा. कंपनीच्या नावाने निविदा भरायच्या नाही.

**प्रभात पाटील :-**

पण मी सांगू शकते ना, मी रिटा शाह आहे.

**रिटा शाह :-**

आपला वाद असा आहे की, संदिप सावंतच्या नावावर परत निविदा यायला नाही पाहिजे. दुसऱ्यांच्या नावावर निविदा घेणार. त्याच्यामध्ये कुठल्याही कायद्यात काही नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, ह्या माणसाने फसवणुक केली आहे. त्याचे इन्कम काय आहे, हे इन्कम टॅक्स डिर्पाटमेंटला त्यांचा जर पॅनकार्ड नंबर असेल तर तिथे ही पत्र लिहा.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक करोड रुपयाचा तो व्यवहार करतो, त्याच्याकडे आय.टी. प्रुफ असेल. त्याच्याकडे पॅनकार्ड असायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

तो ठेकेदार इनकम टॅक्स पे करतो का?

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये आपण व्यापारी आहात आणि असे कुठले रजिस्ट्रेशन ठेकेदाराने बाजार घेतला आणि बाजाराच्या लिलावाची जी ॲडजेसमेंट आपण करत आहोत. त्याकरीता स्थायी समितीचे सदस्य सक्षम आहोत अाणि सक्षम असल्याकारणाने ती लोक आपल्या अधिपत्याखाली बाजार घेतात आणि ह्या बाजाराच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपलिकेला फायदेशीर मोबदला देतात. आज पर्यंतचा आपला हा अनुभव आहे आणि जर त्याठिकाणी स्थायी समितीची सक्षमता नसेल तर कोणी येऊन कोणाला काय देतो, हा विषय आहे आणि आजपर्यंतचा अनुभव आहे. आपण असे जे एक-दोन अनुभव बघितले ते आपण नगरपालिका स्थापन झाल्यापासुन ते आतापर्यंत म्हणजे ती दहा वर्ष आणि ही दोन वर्ष म्हणजे बारा साडेबारा वर्ष ते त्यांनी केलेले आहे. आपण ज्या अटीशर्ती म्हणतो, ह्या अटीशर्ती बरोबर बाजार घ्यायला कोण येईल. हा ठेकेदार ८७ लाखाचा बाजार घेतो तो जर कुठे व्हाईटमध्ये आला तर ते घेणार कोण? हिशोब तो देखील आहे? त्याच्यामध्ये काही गोष्ट आपण बोलतो अाणि बोलताना मला ही कायदे माहिती आहेत. मला ही कायद्याने बोलता येते. कायदा असा असेल. कायद्याने असे करुन घेतले पाहिजे. ते सर्व मान्य आहे. पंरतु एक बाजु ती ही बघितली पाहिजे, जे काही ॲडजेसमेंटने काम होतात आणि आता सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स बोलले की, तीन महिने त्याची जी अनामत रक्कम जमा असते आणि त्या ठेकेदाराने जर दोन महिन्यापर्यंत पैसे भरले नाही तर ती रक्कम जमा होते म्हणजे आपल्याला कुठे लॉस जात नाही, आपला अभ्यास तो आहे. त्याने ८७ हजार रुपये महानगरपालिकेत भरले ते आपण जप्त करतो. ह्याच्यापेक्षा त्याला मोठी सजा कोणती आहे आणि दुसरी शिक्षा, त्याच्यावर ४२० चा गुन्हा नोंदवावा. अशा पद्धतीने प्रशासनाच्या आयुक्त साहेबांना सांगितले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

परत निविदा काढताना ह्याच रक्कमेने काढायचे, असे मी आपणाला सांगतो.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, त्याने देकार रक्कम कशी काय भरली?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, होर्डिंगची निविदा कमी करुन मागत होते ती आपण नाही दिली तसेच हे करा. ही रक्कम ८७ लाखापेक्षा कमी करुन देऊ नका.

**अशोक पाटील :-**

ती कशी देता येईल? देकार रक्कम महानगरपालिकेने ठरवलेली आहे.

**मा. सभापती :-**

ही निविदा आहे आणि ती द्यायची किंवा नाही हे स्थायी समिती सदस्यांनी ठरवायची आहे आणि आपण असे कसे बोलता की, देऊ नका.

**अशोक पाटील :-**

ते आपणच ठरवणार आहोत.

**मा. सभापती :-**

मग असा विषय आहे आणि कधी कधी कायदे आपण कोळुन पितो पण कायद्याने माझे काही पॉवर आहे ते आपण विसरुन जातो, बोलण्याच्या ओघामध्ये.

**गजानन भोईर :-**

यापुढे आपण असे करु द्यायचे नाही.

**अशोक पाटील :-**

ही निविदा मंजुरीला आपल्याच समोर येणार आहे. मंजुरीला तुमचीच पॉवर आहे ना!

**मा. सभापती :-**

होय.

**गजानन भोईर :-**

तरी आपल्याला पुन्हा सांगतो.

**मा. सभापती :-**

हे सांगण्याची आवश्यकता नाही. कारण तुमचीच पॉवर आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मी असा मुद्दा उपस्थित करते की, आपण ८७ लाखाला हा टेंडर दिला आणि त्या ठेकेदाराने आपल्याला ते परत केले. आता आपण परत फेरनिविदा मागवणार. तर ती पन्नासलाही येणार, साठलाही येणार, सत्तर लाखालाही येऊ शकते. कारण मागचे टेंडर पन्नास लाखाला गेले होते. मग आता जास्तीत जास्त साठ, सत्तर ऐंशीपर्यंत येणार. त्याच्यामध्ये आपण त्याला ८७ लाखाला टेंडर दिले होते. मग साठ लाखाला आली तर आपल्याला २७ लाखाचे नुकसान होईल. तर जेवढ्या डिफरन्सचे आपल्याला नुकसान होणार ते वसुल कोणाकडुन करायचे ते प्रशासनाने ठरवा आणि ती जबाबदारी प्रशासनाची आहे.

**प्रभात पाटील :-**

पण त्यापेक्षा कमी रक्कमेला द्यायचेच नाही. ८७ लाखावरच कायम राहायचे.

**विजय पाटील :-**

मॅडम, आता आपण ज्या फेरनिविदा मागवल्या आहेत. त्या आपण अकरा महिन्याच्या मागवल्या आहेत म्हणजे रक्कम तीच आहे. ८७ लाख भागिले बारा गुणिले अकरा अशाप्रकारे आपण निविदा मागविल्या आहेत म्हणजे रक्कमेमध्ये कोणता फरक नाही.

**रिटा शाह :-**

रक्कमेचा फरक सांगत नाही, तुम्ही निविदेमध्ये एक करोड टाका ती निविदा बिलोमध्ये ही येऊ शकते अाणि अव्हाऊ मध्ये ही येऊ शकते. तो मुद्दा मी उपस्थित केलेला नाही. ८७ लाखामध्ये निविदा गेली होती हे आपण मान्य करता ना, मग आता फेरनिविदामध्ये साठ लाखाचे आले तर आपल्याला सत्तावीस लाखाचे नुकसान होणार आहे. ते नुकसान त्या इसमाकडुन भरुन घेण्यांची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य रिटा मॅडमजी मी तुम्हाला खुलासा देतो, आपण त्या निविदा मंजुर करायच्या नाहीत. मग प्रशासन त्यांचे कर्मचारी वापरुन रक्कम वसूल करेल, जसे मागे करत होते.

**हॅरल बोर्जिस :-**

अशा प्रोसेस तुम्ही किती वेळा करणार? त्याला पण काही बंधन आहे का, नाही? आणि परत असे दुसऱ्यांदा ही होऊ शकते.

**अशोक पाटील :-**

वर्षभर बाजार वसुली आपले कर्मचारी करतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, नुकसानाच्या संदर्भात काय?

**रिटा शाह :-**

जो डिफरन्स राहणार, जे नुकसान होणार त्याला प्रशासन जबाबदार राहणार.

**अशोक पाटील :-**

या संदर्भात हा जो वाद निर्माण झाला आहे, पुन्हा निविदा मंजूर करण्याच्या संदर्भात आपण काहीतरी निर्देश द्यावे आणि ह्या ज्या अटीशर्ती बनवल्या आहेत. ह्याच्यामध्ये फेरनिविदा काढाव्यात की, जेणेकरुन अशा ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सोयीस्कर होईल.

**रिटा शाह :-**

तुम्ही अटीशर्ती बदला, वाढवा ते सगळं आम्हाला मान्य आहे. पण ह्या टेंडरमध्ये जे आर्थिक नुकसान मिरा भाईंदर महानगरपालिकेचे होणार आहे. त्यासाठी प्रशासन जबाबदार राहणार ते पैसे वसुल करुन घ्यायचे असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

आपण ठराव मांडला, पण ते कसे काय होईल?

**रिटा शाह :-**

मला सांगा की, रक्कमेमध्ये जो फरक येणार आहे त्याची जबाबदारी कोणाची?

**विजय पाटील :-**

मॅडम, प्रशासनाने जी किंमत ठरवली होती, ती भाईंदर पुर्वेसाठी ५६ लाख, भाईंदर पश्चिमेकरीता ५६ लाख, मिरा रोड ते घोडबंदर याकरीता २९ लाख रुपये आणि उत्तनकरीता ५ लाख ३४ हजार रुपये ठरवले आहे.

**रिटा शाह :-**

मी, हा मुद्दा पहिल्याच वेळी उपस्थित केला की, गेल्या वेळी ५० लाखाला गेली आणि आता जास्तीत जास्त फरक हा १० लाखाचा येणार. पण त्याने डायरेक्ट ८७ लाख रुपये दिले. ८७ लाखाचा टेंडर मिळाल्यांनतर त्याला कोणीतरी सांगितले की, मागचे ५० लाखाला होते आणि तु, ५६ किंवा ६५ लाख द्यायचे होते, तु वेड्यासारखे केले आणि हे ओपन केले की, ह्याच्यामध्ये तीस लाख रुपये मिळत आहे. अशी त्याला कोणीतरी अक्कल दिली म्हणुन त्याने २४ तासात टेंडर मागे घेतले आहे आणि परत हे निविदा निघणार त्याच्यामध्ये कमी रेटने येणार आहे हे मी तुम्हाला लिहुन देते, रिटा शाह म्हणुन. जास्त रक्कम येणारच नाही. हे सर्व सेटिंग आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

८७ लाख रुपये, कुठल्या हिशोबाने काढले असेल.

**रिटा शाह :-**

ह्या सर्व बाबीला माझा निषेध आहे आणि मी विरोध करते. ही फेरनिविदा ८७ लाखाला आली तर ठिक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ही जी ८७ लाखाची निविदा काढली, ती कुठल्या हिशोबाने, कुठल्या रेटने काढली.

**विजय पाटील :-**

याबाबत मी आपणाला माहिती देतो, प्रशासनाने १ कोटी ५० लाख रुपये अंदाज वर्तविले होते, चार विभागाचे आणि स्थायी समितीने त्याच्यामध्ये एक कोटी बजेटमध्ये वाढवले आणि स्थायी समितीने एक कोटी रुपये वाढविल्यामुळे हे सर्व आकडे आहेत ते बदलावे लागले त्यामुळे भाईंदर पुर्व-८७ लाख, भाईंदर पश्चिम-८५ लाख, मिरा रोड ते घोडबंदर-६८ लाख आणि उत्तन-१० लाख रुपये असे मिळुन दोन कोटी पन्नास लाखाचे अंदाज स्थायी समितीने १ कोटी रुपये वाढवल्यामुळे ह्या रक्कमांमध्ये वाढ झाली आहे. अन्यथा प्रशासनाने कळविलेले अंदाज आहेत ते एक कोटी पन्नास लाखाचे आहे.

**रिटा शाह :-**

इन शॉर्ट मे आपको निविदा मंगाना हो तो मंगा लो। इतना बडा टाईमपास करने का उद्दिष्ट, बिलो मे अगर निविदा आती है तो उसे ले लो, मगर जो डिफरन्स आयेगा उसका नुकसान कौन भरेगा? उसकी जबाबदारी प्रशासन पर होगी।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

डिफरन्स आएगा, या नही यह हमे स्थायी समिती मे मालूम होगा। क्योंकी मंजुरी के लिए वह अपने सामने वाला है।

**रिटा शाह :-**

आनेवाली मिटींग मे हम आपको जरुर पुछेंगे। बाकी जो स्थायी समिती अध्यक्ष का अधिकार है, आपको इसके बारे मे क्या डिसीजन लेना है, गुन्हा नोंदने का या नही नोंदनेका यह आपका डिसीजन है। ॲक्चुली हमारे पास यह विषय आना ही नही चाहिए।

**मॉरस रॉड्रीक्स :-**

गुन्हा नोंदनेका सवाल ही नही आता है। गुन्हा कौनसी बात पर दाखल करेंगे? सब सदस्य इसके लिए क्यों झगड रहे है? किसको मालुम नही है उसकी अनामत रक्कम जप्त होगी वही उसका गुन्हा है।

**गजानन भोईर :-**

आगे, उसके नाम से कोई निविदा भर सकता है?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हमने उस ठेकेदार नाम ब्लॅक लिस्ट मे डालनेके बाद वह कैसे निविदा भर सकता है? और हम भी वह निविदा नही ले सकते है?

**जोजफ घोन्सालवीस :-**

तो फिर महानगरपालिका कि तरफ से पोलीस कम्प्लेंट क्यों किया?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हम यह बोल सकते है, वो ठेकेदार वही नाम से निविदा नही पाए।

**अनंत पाटील :-**

ती तक्रार कशी काय केली?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, अनामत रक्कम एकदा जप्त केल्यानंतर आपण, पोलीस स्टेशनला गुन्हा का नोंदवला, पत्र का पाठवले? त्याचे कारण काय असेल.

**अनंत पाटील :-**

पोलीस स्टेशनला तक्रार का केली?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, स्थायी समिती सदस्य म्हणुन मी माझे मत मांडत आहे की, सदर निविदा ज्या त्या ठेकेदाराने मागे घेतलेल्या आहेत ते कुठल्या कारणाने मागे घेतले ते ठेकेदाराच सांगू शकतो त्याने तुम्हाला लेखी पत्र दिले आहे. त्यात कारणही दिले असेल आणि त्याने निविदा मागे घेतली आहे. म्हणुन त्याच्यावर काय कार्यवाही करायची तो प्रशासनाचा भाग आहे. तो आमचा भाग नाही आणि ते फेर निविदा मागवणार तो आमचा भाग नाही आणि ते फेर निविदा मागवणार आहेत, त्याच्यामध्ये तो भरणार की नाही भरणार. दुस-यांच्या नावावर भरणार? त्याच्यामध्येही मी जबाब देणार नाही कारण तो माझा अधिकार नाही, तो प्रशासनाचा अधिकार आहे. त्याला थांबवायचे किंवा नाही थांबवायचे. म्हणुन आपण आमच्याकडे जी निविदा आणलेली आहे. सभापती साहेबांनी आम्हाला पत्र ही दिले आहे की, सदर ठेकेदार कॅन्सल झाल्यावर जो मागचा ठेकेदार आहे. त्याला एक महिने आपण कन्टीन्यु करायचे, त्याला मी माझी सहमती देते. पंरतु, त्याच्यामध्ये आपण जी परत निविदा मागवणार आहात आणि त्या निविदेत जो फरक येणार आहे, बिलोमध्ये रक्कम जाणार आणि ती निविदा नक्कीच बिलोमध्ये जाणार हे मी ठामपणे सांगते आणि ती निविदा बिलोमध्ये जाताना जे काही नुकसान होणार आहे त्याची प्रशासनाची जबाबदारी आहे आणि ॲज अ सभासद मी त्या गोष्टीचा विरोध करत आहे आणि त्या गोष्टीशी मी सहमत नाही असे सांगते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.):-**

सदर बाबतीमध्ये मी खुलासा करु इच्छितो, ज्यावेळेस प्रशासनाने ही रक्कम दिली होती, त्या रक्कमेवर स्थायी समितीने सर्वानुमते मान्यता घेऊन त्यावेळी ती वाढ केलेली आहे. त्यामुळे त्याला प्रशासन कुठल्याही प्रकाराने जबाबदार नाही, हे मी आता आपल्याला स्पष्ट सांगतो. ही जी वाढ केलेली आहे, ही प्रशासनाने केलेली नाही. प्रशासनाने जी रक्कम दिलेली आहे, त्या रक्कमेमध्ये भाईंदर पूर्व-५६ लाख, भाईंदर पश्चिम-५६ लाख, मिरा रोड-२९ लाख, उत्तन-५ लाख ३४ हजार, आणि स्थायी समितीने ८७ लाख रुपये, ८५ लाख रुपये, ६८ लाख रुपये व १० लाख रुपये असे दोन कोटी पन्नास लाख रुपये केले. हे आपण सदस्य रक्कम वाढवता आणि त्याला प्रशासन कसे जबाबदार असेल? त्याला प्रशासन अजिबात जबाबदार असणार नाही.

**रिटा शाह :-**

मी आपल्याला धन्यवाद देते. कारण प्रशासनाने आपले स्पष्ट मत दिले की, ह्याला प्रशासन जबाबदार राहणार नाही. म्हणजे एखादा ठेकेदार प्रशासनाचा छळ करतो ते स्पष्टपणे दिसुन येते. स्थायी समितीने आकडे दिले आहे. प्रशासनाकडे स्थायी समितीचे आकडे होते. त्याने जर अबाव्हमध्ये येऊन जर निविदा भरली तर हे कोणाचे छळ आहे. जर अबाव्हमध्ये आले आणि त्याला आता समजले की, मी ते अबाव्हमध्ये घेतले आहे, कोणीतरी त्याला अक्कल दिली. त्या ठेकेदाराने निविदा अबाव्हमध्ये भरली आणि कॅन्सल केली. त्यात नक्की नुकसान होणार आहे. ते तुम्ही केले, प्रशासनाने केले की, स्थायी समितीने केले म्हणुन त्याबद्दल मी बोलत नाही. आता आपले स्पष्ट मत आम्हाला मिळाले आहे. म्हणुनच सांगतें ८७ लाखाची निविदा ६० लाखालाही जाणार किंवा ५६ लाखामध्येही जाणार. ती निविदा

बिलोमध्येच येणार आहे. मग एखाद्या इसमाने, एखाद्या ठेकेदाराने मी नेहमी नेहमी बोलते. स्थायी समिती आणि प्रशासनाचा छळ करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्यावर ४२० चा गुन्हा कसा नाही नोंदवत आणि पोलीस स्टेशन जर नोंदवत असेल तर आपण सर्व डेलिगेशन घेऊन तिथे जाऊ.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़ो.):-**

गुन्हा नोंदविण्यासाठी प्रशासनाकडुन पूर्णपणे कार्यवाही पूर्ण झालेली आहे. पोलीस स्टेशन जी जी माहिती विचारेल ती ती माहिती देण्यासाठी आम्ही तत्पर आहोत. वेळोवेळी जी माहिती विचारणार ती सर्व माहिती आम्ही देऊ. गुन्हा दाखल होण्याची कार्यवाही चालू आहे. ह्याच्यापेक्षा अजुन काय करु शकतो.

**रिटा शाह :-**

साहेब, गुन्हा दाखल होण्याची कार्यवाही चालु आहे. पोलीसांनी जे पत्र दिले आहे. त्याच्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे. तुमचे याबाबतचे अटीशर्ती काय आहेत ते आम्हाला द्या. पण तुमच्या अटीशर्ती तसे काहीच नाही. तुम्ही गुन्हा नोंदवु शकत नाही.

**अशोक पाटील :-**

निविदा मागे घेण्यासाठी ठेकेदाराने कारण काय दिले आहे?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांना माझे नम्र निवेदन आहे, आपण या विषयावर भरपुर चर्चा केली आणि ही चर्चा होणे क्रमप्राप्त आहे, ह्याच्यामधून आपल्याला माहिती मिळते. आपला विषय एकच आहे ज्या निविदा ज्याने भरल्यानंतर त्याची जी ८७ हजार रूपये एवढी अनामत रक्कम होती ती जप्त करायची, आपण त्यावर रूलिंग द्यायचे आहे. प्रशासन जो निर्देश, शिक्का मारतो ते आपण करायचे आहे आणि त्याच्यावर ४२० चा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशापद्धतीचा ठराव करून आपण विषय संपृष्टात आणायचा आहे. आपण संपूर्ण चर्चा केली आणि शेवटी त्यातून ते निष्पन्न होते. ह्याच्या व्यतिरिक्त आणखीन निष्पन्न होत नाही की, ३०२ हा गुन्हा लावू शकतो किंवा त्याला आणखीन कुठला कलम लावू शकतो. असे कुठलाही कलम आपण लावू शकत नाही आणि आपल्या ह्या माहितीप्रमाणे जर फायनानशियली त्याने जर नुकसान केले असेल तर १९४९ च्या अन्वये मुंबई प्रांतिक कायद्यामध्ये जर आणखीन काय असेल तो प्रकार देखील आपण पडताळून पाहिला त्यात आपल्याला काय दिसले नाही. फक्त एकच म्हणणे असे आहे की आणि ज्यावेळेला स्थायी समितीने बाजार संर्दभामध्ये फिगर वाढवून दिले असे प्रशासन बोलते पण आपल्याला माहिती आहे जशी माणसांची उत्पत्ती होते त्या पद्धतीने मिरा भाईंदर शहरामध्ये हॉकर्सची, फेरीवाल्यांची उत्पत्ती सुरू होते. भरपूर फेरीवाले रोज येतात आणि त्यांनी जी रक्कम भरलेली आहे. त्यावेळी त्याने रक्कम भरताना पूर्ण विचार करूनच रक्कम भरलेली होती, आता त्याची अन्य कारणे असतील. कारणाचा हा विषय महत्त्वाचा नाही आणि कारणे शोधायचा विषय आपलासुद्धा नाही. परंतु, ती रक्कम जर माणूस वाढवून घेत आहे, त्याला पूर्ण कल्पना आहे. आज मिरा रोडमध्ये रक्कम वाढवून घेतलेली आहे. मिरा रोडला ज्याने ठेका घेतला त्याची रक्कम वाढवून घेतलेली आहे, ती रक्कम कशाला वाढवली? तर तिथे हॉकर्स वाढलेले आहेत. आज आपण या शहरामध्ये नगरसेवक या नात्याने अडीच वर्षाचा काळ झाला. काही जुने सन्मा. नगरसेवक होते त्यांचे कोणाचे बारा वर्ष झाले, सात वर्ष झाली त्या कालावधीमध्ये आपण स्वतः बघतो की, या मिरा भाईंदर परिसरामध्ये किती हॉकर्स वाढत आहेत. मग आपण हे कसे म्हणता की, ही रक्कम आपण वाढवली, एवढी रक्कम वाढवायला का पाहिजे? हा विषय आपला का चालला आहे? ही रक्कम वाढवल्यानंतर स्थायी समितीच्या सदस्यांनी जो प्रस्ताव मा. महासभेसमोर घेवून गेल्यानंतर त्याला मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. ती मान्यता देताना मा. महासभा ही आपली सुप्रीम पावर आहे. जर त्या सुप्रीम पावरने मान्यता दिली असेल आणि ती मान्यता देताना सर्वांनी ह्या गोष्टीचा विचार केला असेल म्हणून आज जर ह्या निविदेमध्ये फेरबदल नंतर आला, तर त्याला प्रशासन जबाबदार आहे असे आपण बोलूच शकत नाही.

**रिटा शाह :-**

प्रशासनाने उत्तर दिलेले आहे आणि आता कुठे प्रश्नच येत नाही, प्रशासन जबाबदार असेल.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे आणि जे वाढीव घेतलेले आहे ती वस्तुस्थिती आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, त्या ठेकेदाराने जे लेखी स्वरूपामध्ये पत्र दिले आहे त्यात कारणे काय दिली आहेत?

**रिटा शाह :-**
आपण त्या ठेकेदाराने दिलेल्या पत्राचे वाचन करा.
**मा. सभापती :-**
त्या पत्राचे वाचन सभागृहात केलेले आहे.
**रिटा शाह :-**
त्या पत्राचे वाचन केले नाही.
**मा. सभापती :-**
पोलीस स्टेशनमधून आलेल्या पत्राचे वाचन केले आहे.
**रिटा शाह :-**
ठेकेदाराने दिलेल्या पत्राचे वाचन करावे.
**मा. सभापती :-**
सदर पत्राचे वाचन सभागृहात करण्यात यावे.
**प्रेमनाथ पाटील :-**
विजय पाटील साहेब, मिरा रोडची गेल्या वर्षाची रक्कम किती होती?
**विजय पाटील :-**
मिरा रोडला गेल्यावर्षी २६ लाख, १७ हजार रूपये इतकी होती.
**प्रेमनाथ पाटील :-**
गेल्या वर्षी मिरा रोडची २६ लाख १७ हजार रूपये एवढी रक्कम होती आणि आता ६९ लाख ५० हजाराला घेतले आहे म्हणजे किती फरक झाला.
**प्रभात पाटील :-**
एवढा फरक आहे तर भाईंदर पुर्वेला वाढवायला काय हरकत आहे? त्यात काही हरकत नाही.
**अशोक पाटील :-**
म्हणून आपणच वाढवून दिले आहे ना!
**जोजफ घोन्सालवीस :-**
आपण आम्हाला पत्र वाचून दाखवा म्हणजे आम्हाला समजेल ते काय आहे.
**रिटा शाह :-**
साहेब, जे काही आहे ते पिक्चर आमच्या समोर आलेले आहे, ती निविदा कॅन्सल झाला आहे. आपण ते पत्र वाचा आणि तसे करून घ्या.
(श्री. विजय पाटील सो. ह्यांनी ठेकेदाराने दिलेल्या पत्राचे सभागृहात वाचन केले.)
**अशोक पाटील :-**
म्हणजे त्या ठेकेदाराने निविदा भरल्यानंतर सर्व्हे केला?
**गजानन भोईर :-**
त्याने नंतर सर्व्हे केला?
**मा. सभापती :-**
सन्मा. सदस्य सदर ठेकेदाराच्या पत्रावर कॉमेन्ट्स करून आपल्याला उपयोगच नाही.
**अशोक पाटील :-**
सभापती साहेब, त्याच्यावर ४२० ची कार्यवाही करण्याचा ठरावा कराव आणि त्या ठेकेदाराने भरलेली अनामत रक्कम जप्त करावी.
**विजय पाटील :-**
अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.
**प्रभात पाटील :-**
विजय पाटील साहेब आपण त्या सदर व्यक्तीला बघितले आहे का, तो कसा आहे.
**विजय पाटील :-**
सदर व्यक्तीला मी पाहिले आहे.
**प्रभात पाटील :-**
तो त्याच पत्त्यावर राहतो?
**विजय पाटील :-**
होय, त्याच पत्त्यावर राहतो.

**प्रभात पाटील :-**

आपण तिथे जावून वेरीफाय केले आहे का, हाच त्याचा निवासाचा पत्ता आहे आणि त्याने जर समजा, उद्या प्रभात पाटील नावाने तुमच्याकडे निविदा भरली तर तुम्ही त्याला ओळखू शकाल?

**विजय पाटील :-**

होय.

**गजानन भोईर :-**

तो निविदा भरायला कशाला येईल? उदा. प्रभात पाटीलच जातील आणि तो पैसे देईल.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, माझा असा प्रश्न आहे की, आपण ह्यासाठी फेरनिविदा मागवणार आहात की, मागवल्या आहेत.

**विजय पाटील :-**

फेरनिविदा आपण मागवल्या आहेत.

**रिटा शाह :-**

फेरनिविदेमध्ये आपण कोणत्या अटीशर्ती टाकल्या आहेत?

**विजय पाटील :-**

ह्याच अटीशर्ती देण्यात आलेल्या आहेत.

**रिटा शाह :-**

नाही, माझी अशी एक मागणी आहे की, तुम्ही जी फेरनिविदा मागवता त्यात ह्या सर्व बाबी ॲड करून नंतर निविदा मागवा आणि निविदा मागवली असेल तर फेरनिविदा मागवा.

**विजय पाटील :-**

अटीशर्तीमध्ये आम्ळी बदल करुन घेतो.

**रिटा शाह :-**

अटीशर्तीमध्ये ॲड करून नंतर फेर निविदा मागवा. ह्या फेर निविदेमध्ये त्या अटीशर्ती लागू पडणार की, नाही त्याचे स्पष्टीकरण द्या. कारण शेवटी प्रशासनच उत्तर देणार आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.):-**

आम्हाला सांगणार त्याप्रमाणे आम्ही करू.

**रिटा शाह :-**

आपण जे फेरनिविदा मागवल्या आहेत त्यात अटीशर्ती ॲड करून मागवा, नाहीतर त्यासाठी माझा विरोध आहे. ज्या कारणासाठी माणसाने आज निविदा कॅन्सल केली त्याच्याकरिता आज आपल्याकडे कायदा नाही. मग फेरनिविदा मागवताना त्या अटीशर्ती ॲड करून मागवा नाहीतर ती फेरनिविदा मागवायची नाही.

**मा. सभापती :-**

मॅडम, एका विषयावर एका सदस्यांनी किती बोलले पाहिजे ह्याचा विचार केला पाहिजे.

**रिटा शाह :-**

मी जास्त बोलत नाही.

**गजानन भोईर :-**

हा किती लाखाचा प्रश्न आहे?

**रिटा शाह :-**

आपण असे कसे बोलता, किती बोलायचे? म्हणजे येथे काही लिमिटेशन आहे. असे असेल तर आपण बोलायची मर्यादा ठरवून द्या.

**मा. सभापती :-**

लिमिटेशन नाही, पण येथे एकच विषय चालला आहे आणि एका विषयावर एका सदस्यांनी...

**रिटा शाह :-**

मग आपण रूलिंग का देत नाही. मी काय बोलले निविदेबाबत ते आपण अटीशर्तीमध्ये समावेश करा.

**मा. सभापती :-**

आपण अटीशर्तीने निविदा दिलेल्या आहेत आणि जेव्हा निविदा प्राप्त झाल्यानंतर त्याचे ॲग्रीमेंट जेव्हा करू त्या ॲग्रीमेंटमध्ये ज्या अटीशर्ती पाहिजेत त्या अटीशर्ती आपण त्याच्यात लिहून घेवू.

**रिटा शाह :-**

मी, तेच विचारते जी फेरनिविदा काढणार आहोत त्याच्यामध्ये अटीशर्ती ॲड करा. तसे सांगा ना, करणार म्हणून.

**मा. सभापती :-**

मी सांगतो ना.

**रिटा शाह :-**

सांगाता, पण आपण अजून रूलिंग दिलेली नाही. आता जी आपण नविन अटीशर्ती ठरवली त्यात तुम्ही जी ह्या ठेक्याची फेरनिविदा मागवणार आहोत त्याच्यात ॲड करून निविदा मागवा.

**मा. सभापती :-**

फेरनिविदा मागितलेली आहे आणि जर फेरनिविदा आल्यानंतर त्याचे जे ॲग्रीमेंट होईल, त्या करारनाम्यामध्ये आपण त्या अटीशर्ती देवू.

**प्रेमनाथ पाटील / सुर्यकांत भोईर :-**

को-या निविदा टाकल्या आहेत त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**गजानन भोईर :-**

तशीच कार्यवाही ह्यांच्यावर होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेबांनी रूलिंग द्यायला पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, फेरीवाला झोन, ना-फेरीवाला झोन तिथे बोर्ड लागायला पाहिजे, किती गाड्या उचलून आणता.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, असेच व्हायला पाहिजे आणि जो अधिकारी त्या विभागाचा असेल त्याने त्याच्या कर्तव्याचे जर पालन केले नाही तर त्या अधिका-यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

फेरीवाला झोन आणि ना-फेरीवाला झोन असे फलक लावणार आहात, पण तो फलक केव्हा लावणार आहात?

**जोजफ घोन्सालवीस :-**

प्रत्येक मंडईजवळ बोर्ड लागला पाहिजे. किती वसुली करायची, कोणी करायची हे सर्व त्या बोर्डावर लिहिले पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मंडईतून वसुल करायचे नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जिथे वसुली करायची आहे तिथे रस्त्यावर बोर्ड लावा म्हणजे ते नियम वाचतील.

**सुर्यकांत भोईर :-**

विजय पाटील साहेब, ह्या ज्या को-या निविदा टाकतात त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करता?

**अशोक पाटील :-**

त्यांच्यावरही ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

बरोबर आहे, हे ठेकेदार महापालिकेची फसवणूक करतात. यात महापालिकेचा अपमान आहे, अधिका-यांचा अपमान आहे.

**मा. सभापती :-**

पहिल्यांदा असे सांगितले निविदा नाकारल्याने त्या ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त होईल.

**प्रभात पाटील :-**

पण त्याने अनामत रक्कम कुठे भरली आहे?

**मा. सभापती :-**

अनामत रक्कम भरली आहे आणि ती जमा झाली.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

अटीशर्तीमध्ये तसे लिहिलेले असते.

**मा. सभापती :-**

आपली वाट न बघता, अनामत रक्कम ही प्रशासनाने जप्त केली आणि पोलीस स्टेशनला पत्रही दिले पण त्यात ॲडीशनल आपण काहीच करू शकलो नाही. जी रक्कम प्रशासनाने जप्त केली आहे आणि प्रशासनाने ४२० चा गुन्हा दाखल करावा अशी पोलीस स्टेशनला तक्रार केली त्याच्या व्यतिरिक्त तिसरा कोणताही विषय आपण केला नाही असे माझे म्हणणे आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, आपण काहीच केले नाही असे होवू शकत नाही, आपण असे बालू नये.

**मा. सभापती :-**

तिसरा पर्याय जो आहे तो द्यायला पाहिजे होता आणि मी, तुम्हाला पहिल्यांदा रूलिंग दिले आहे की, त्या ठेकेदाराची आपण अनामत रक्कम जप्त करतो आणि त्याच्यावर ४२० चा गुन्हा दाखल करायला पोलीस स्टेशनला आपण पत्र देतो. ह्यापूर्वी सन्मा. सदस्यांनी ज्या सूचना मांडल्या त्याला आपण तेच उत्तर दिले असे मला बोलायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्या बोलण्यातून असे झाले की, आपण गेल्या तास-दिडतासात नुसता गोंधळ घातला आणि आउटपुट मिळाले नाही, असे आपण बोलू नका. आउटपुट हे आहे की, येणाऱ्या संभाव्य परिस्थितीत आणि पुढच्या परिस्थितीत ह्या घटनांची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणून बऱ्याच सदस्यांनी येथे काही काही सूचना केल्या आहेत. त्याचा आपण वापर करावा आणि अंर्तमुख होवून विचार करण्याची गोष्ट आहे. ह्याच्यातून काही निघाले नाही असे आपण बोलू नये.

**मा. सभापती :-**

सूचना आल्या आणि ह्याच्यामधून संशोधन चालू होते की, आपल्याला आणखीन काही कायदेशीर करता येते का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, प्रशासन सांगते की, स्थायी समितीने आकडे फुगवले म्हणून ती किंमत वाढली. त्यांच्या पत्रात त्याने तोच उल्लेख आहे. ४२० चा आपण जो कलम लावायला सांगता कसे काय? कारण त्याचे क्लेरीफिकेशन बरोबर आहे ना! त्याला परवडत नाही असे प्रशासनाच सांगते की, आकडे आपण वाढवून दिले.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी आपण ही ह्या सदनाचे सभापती होता, आपण खाजगीमध्ये असे ही बोलता की जी दुसरी निविदा आहे त्याला मंजूरी द्या. एकीकडे आपण असे ही बोलता आणि एकीकडे हा विषय मंजूर करता. नेमका कोणता विषय आपल्याला मंजूर आहे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

फेरनिविदा काढण्याचा विषय मंजूर केलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्या बाबतीमध्ये काय ठराव झाला?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

प्रशासन तीन वेळा निविदा मागू शकते आणि तरी सुद्धा कोणी आले नाही तरी दुसऱ्यांदा ओपन टेंडर कॉल करू शकता.

**प्रभात पाटील :-**

ह्या ठेकेदाराच्या बाबतीत काय ठराव झाला त्याबाबत सांगा. ठराव मंजूर बोललात म्हणून.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ठराव मांडला ना, सभापती साहेबांनी सांगितले ना, फेरनिविदा मागवा.

**रिटा शाह :-**

आपण ठरावाचे वाचन करा.

**मा. सभापती :-**

ठराव वेगळा आहे, आपली जी सूचना आहे त्या सुचनेवर रूलिंग असे आहे की, निविदाधारकांची अनामत रक्कम जप्त करावी आणि त्याच्यावर पोलीस कारवाई करावी हे रूलिंग झाले आणि जो ठराव मांडलेला आहे, त्या ठरावात असे आहे की,.....

**प्रभात पाटील :-**

आपण त्या ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकायला विसरलात.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे काळी यादी कुठे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे असे रूलिंग दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

विजय पाटील साहेब आपण ठराव वाचा.

**हॅरल बोर्जीस :-**

भाईंदर पूर्व-पश्चिम आणि उत्तन या तीन ठिकाणच्या फेरनिविदा काढण्यासाठी आपण प्रशासनाला ठराव देत आहोत. मिरा रोडचे ॲज इट इज जसा मंजूर झाला आहे त्याचप्रमाणे असणार यात दोन गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत. भाईंदर पूर्व-पश्चिम आणि उत्तन या विभागाचे सन २००४-०५ या वर्षात ज्या ठेकेदाराने ठेका घेतलेला आहे त्यांना पुढील एक महिन्यासाठी माहे एप्रिल २००५ ते ३० एप्रिल, २००५ या एक महिन्यासाठी त्यांना आपण वाढीव मुदत देत आहोत आणि सन्मा. सभापती साहेबांनी प्रशासनाच्या निर्दशनास आणले ज्या ठिकाणी महानगरपालिकेने बाजार फी वसुल करू नये, अशी जी मनाई केलेली आहे, त्याठिकाणी ठेकेदार बाजार फी वसूल करत आहे असे प्रशासनाच्या निर्दशनास आल्यास सदर रक्कम महानगरपालिकेत त्यांना त्वरीत भरणा करण्यास बंधनकारक आहे असे सन्मा. सभापती साहेबांनी प्रशासनास कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

**रिटा शाह :-**

आपण ठरवलेल्या अटीशर्ती ठरावामध्ये ॲड करा.

**हॅरल बोर्जीस :-**

आणि ज्या ठेकेदाराने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान आणि फसवणूक केली आहे. त्याबाबतीत ८७ हजार रूपये जी अनामत रक्कम भरली आहे ती रक्कम जप्त करून महानगरपालिकेच्या निधित जमा करावी व सदर ठेकेदारास काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठेकेदाराच्या नावाचा उल्लेख करावा.

**हॅरल बोर्जीस :-**

ठेकेदाराच्या नावाचा उल्लेख आहे.

**विजय पाटील :-**

संदिप सांवत म्हणून नावाचा उल्लेख केलेला आहे.

**अशोक पाटील :-**

४२० चा गुन्हा दाखल करण्याबद्दल ही नमुद करावे.

**हॅरल बोर्जीस :-**

त्याचे रुलिंग सन्मा. सभापती साहेबांनी दिलेले आहे.

**अशोक पाटील :-**

आपण ते ठरावात नमुद करून घ्या.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही तसा ठराव करून पोलीस स्टेशनला पाठवा.

**अशोक पाटील :-**

त्या ठेकेदारावर ४२० चा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया प्रशासनाने करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

को-या निविदा टाकतात त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**प्रभात पाटील :-**

एकत्रित होवून विषय व्हायला पाहिजे होता पण को-या निविदांचा विषय आलाच नाही.

**अशोक पाटील :-**

ज्यांनी को-या निविदा टाकल्या आहेत त्यांनी पण फसवणूक केली आहे. त्यांना काळ्या यादीत टाका आणि त्यांच्यावर ४२० चा गुन्हा नोंदवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

अशा ठेकेदारांना काळया यादीत टाका.

**सुर्यकांत भोईर :-**

कोऱ्या निविदा भरून जे ठेकेदार महानगरपालिकेचा अपमान करतात. असे करून ते महानगरपालिकेबरोबर खेळ खेळतात का?

(श्री. विजय पाटील सो. ह्यांनी प्रकरण क्र. १७१ च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**विजय पाटील :-**

ठरावात दुरूस्ती आहे. ज्या ठिकाणी महानगरपालिकेने बाजार फी वसुली करता मनाई केली त्या ठिकाणी बाजार वसुली ठेकेदाराने केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास सदर रक्कम ठेकेदाराने महानगरपालिकेत त्वरीत भरणा करण्याचे बंधनकारक राहिल व ठेकेदारावर कार्यवाही केली जाईल.

**केशव घरत :-**

साहेब, काही ठिकाणी दोन वेळा वसुली केली जाते, त्याचे काय?

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**विजय पाटील :-**

वसुली २४ तासातून एकदाच करायची आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

दोनदा वसुली होते. सकाळी पावती देतात तर संध्याकाळी पावती देत नाही. अशी जी वसुली केली जाते त्यांच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

तसे बोर्ड लावा. उत्तनला दोन वेळा वसुली करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

महानगरपालिकेतर्फे बोर्ड लावून जी बाजार फी वसुली आहे ती फक्त एकदाच घ्या असा तुम्ही त्यात उल्लेख करा कारण ते दहा रुपया ऐवजी वीस रूपये घेतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठरावात बोर्ड लावायचे असे नमुद करून घ्या.

**मा. सभापती :-**

त्यासाठी ठरावाची गरज नाही, ती कार्यवाही आहे. प्रत्येक विभागामध्ये ज्या ठिकाणी फेरीवाले बसण्याचा रस्ता आहे आणि जिथे फेरीवाले बसू नये अशा रस्त्यांचे जे कॉर्नर असेल, नाका असेल, त्या नाक्यावर आपले फलक लागले पाहिजे आणि त्या फलकावर त्यापद्धतीने लिहिले पाहिजे व ज्या आपल्या कॉमन अटीशर्ती आहेत, ॲग्रीमेंटच्या अटीशर्ती नाहीत. कॉमन अटीशर्तीत फेरीवाल्यांनी कुठे बसायचे आणि कुठे बसू नये आणि २४ तासात एकदा बाजार फी वसुल केली जाईल अशा पद्धतीचा फलक लावावा.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, अटीशर्तीमध्ये उल्लेख आहे की, आदिवासी विभागात बाजाराची वसुली करू नये.

**विजय पाटील :-**

आदिवासी वर्गाकडून वसुली करू नये असे आहे. आदिवासी विभागाकडून नाही.

**केशव घरत :-**

आदिवासी वर्गाकडून तेच ना! प्रभाग नाही. जर आदिवासी कामधंदा करत असतील तर त्यांच्याकडून वसुली करू नये.

**कैलासबेन जानी :-**

फेरीवाला झोन आणि ना-फेरीवाला झोन येथे बोर्ड लावायचे.

**गजानन भोईर :-**

आता सभापती साहेब बोलले की बोर्ड लावायचे.

**प्रकरण क्र. १७१ :-**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षाकरिता बाजार लिलावास मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. १८५ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका प्रतिवर्षी भाईदर (पुर्व), भाईदर (प.), मुर्धे ते उत्तन, मिरारोड ते घोडबंदर या विभागातील बाजाराचे लिलाव प्रतिवर्षी करीत असते. महानगरपालिकेने सन २००५-२००६

या आर्थिक वर्षाकरिता बाजार लिलाव बोली पध्दतीने न करता दि. १५/०३/२००५ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन जाहीर निविदा सिलबंद लखोटयात मागवण्यांत आलेल्या होत्या. महानगरपालिकेने या सन २००५-२००६ वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकांत बाजार वसुली करिता २ कोटी ५० लाखाची तरतूद केली असल्याने प्रत्येक विभागांची एक वर्षाकरिता बाजार फी वसुलीच्या देकाराच्या रक्कमा खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **विभाग** | **देकारांची किमान रक्कम** | **इसारा रक्कम** | **सुरक्षा अनामत रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | भाईदर (पुर्व) | रु.८७,००,०००/- | ८७,०००/- | १२,१८,०००/- |
| २ | भाईदर (प.) | रु.८५,००,०००/- | ८५,०००/- | ११,९०,०००/- |
| ३ | मिरारोड, घोडबंदर, काशिमिरा | रु.६८,००,०००/- | ६८,०००/- | ९,५२,०००/- |
| ४ | उत्तन | रु.१०,००,०००/- | १०,०००/- | १,४०,०००/- |

वरील विभागातील बाजार फी वसुली बाबतच्या प्राप्त झालेल्या निविदा दि. २३/०३/२००५ रोजी सायंकाळी ठीक ५.०० वाजता उपस्थित निविदा धारक व निविदा समिती सदस्य याच्या समक्ष उघडण्यात आल्या. त्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे...

| **अ.क्र.** | **विभाग व देकारांची किमान रक्कम** | **निविदा धारकांचे नांव व पत्ता** | **निविदेत नमुद केलेली रक्कम** |
|---|---|---|---|
| **१** | **भाईदर (पुर्व), देकारांची किमान रक्कम रु. ८७,००,०००/- (अक्षरी रु. सत्याऐंशी लाख मात्र)** | **श्री. संदीप विश्वनाथ सावंत, सी/११०, गजानन प्रसन्न अपार्टमेंट, फाटक रोड, भाईदर (प.)** | **रु. ८७,५०,०००/- (अक्षरी रु. सत्याऐंशी लाख पन्नास हजार मात्र)** |
| २ | | श्री. प्रेमकुमार चौहान, ७०४, ओम शिवदर्शन टॉवर, ९० फूट रोड, भाईदर (प.) | रु. ५२,१०,१०१/- (अक्षरी बावन्न लाख दहा हजार एकशे एक मात्र) |
| ३ | | श्री. पॅट्रीक जोजफ रॉड्रीक्स, २०२, स्टार पॅलेस,स्टेशन रोड, भाईदर (प.) | रु. ५६,०००/-(अक्षरी रु. छपन्न हजार मात्र) |
| ४ | | श्री. जयदेव रामचंद्र किणी, १०४, एकविरा अपार्टमेंट, राममंदिरसमोर, भाईदर (प.) | रु. ३५,००,०००/- (अक्षरी रु. पत्तीस लाख मात्र) |
| ५ | | श्री. ललित मनोहर राणे, २१५/२१६, गंधर्वराज अपार्टमेंट, खारीगाव, भाईदर(पुर्व) | रु. ५१,१०,१०१/- (अक्षरी रु. एकावन्न लाख दहा हजार एकशे एक मात्र) |
| ६ | | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा,शॉप नं.१, गजानन प्रसन्न अपार्टमेंट, भाईदर (प.) | निविदेत रक्कमेचा उल्लेख नाही (कोरी निविदा). |
| **अ.क्र.** | **विभाग व देकारांची किमान रक्कम** | **निविदा धारकांचे नांव व पत्ता** | **निविदेत नमुद केलेली रक्कम** |
| १ | **भाईदर (पश्चिम) देकारांची किमान रक्कम रु. ८५,००,०००/- (अक्षरी रु. पंच्याऐंशी लाख मात्र)** | श्री. ललित मनोहर राणे, २१५/२१६, गंधर्वराज अपार्टमेंट, खारीगाव, भाईदर(पुर्व) | **रु. ५०,००,१०१/- (अक्षरी रु. पन्नास लाख एकशे एक मात्र)** |
| २ | | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, शॉप नं.१, गजानन प्रसन्न अपार्टमेंट, भाईदर (प.) | निविदेत रक्कमेचा उल्लेख नाही. (कोरी निविदा) |
| ३ | | श्री. पॅट्रीक जोजफ रॉड्रीक्स, २०२, स्टार पॅलेस,स्टेशन रोड, | रु. ५२,०००/-(अक्षरी रु. बावन्न हजार मात्र) |

| अ.क्र. | विभाग व देकारांची किमान रक्कम | निविदा धारकांचे नांव व पत्ता | निविदेत नमुद केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| | | भाईदर (प.) | |
| ४ | | श्री. जयदेव रामचंद्र किणी, १०४, एकविरा अपार्टमेंट, राममंदिर समोर,भाईदर (प.) | रु. ४०,००,०००/- (अक्षरी रु. चाळीस लाख मात्र) |
| ५ | | श्री. प्रेमकुमार चौहान, ७०४, ओम शिवदर्शन टॉवर, ९० फूट रोड, भाईदर (प.) | रु. ५२,००,०००/- (अक्षरी रु. बावन्न लाख मात्र) |
| **अ.क्र.** | **विभाग व देकारांची किमान रक्कम** | **निविदा धारकांचे नांव व पत्ता** | |
| १ | **मिरारोड ते चेणा-वरसावे देकारांची किमान रक्कम रु. ६८,००,०००/- (अक्षरी रुपये अडसष्ट लाख मात्र)** | श्री. सावळीराम बाळमुख आव्हाड, डी/४०१, साईदर्शन बिल्डिंग, साईकृपा कॉम्प्लेक्स, काशिमिरा, मिरारोड (पुर्व) | रु. ६८,२३,०००/- (अक्षरी रु. अडसष्ट लाख तेवीस हजार मात्र) |
| २ | | **श्री. अब्दुल रेहमान एच. खान, ४, गंगा नारायण स्मृती, बी. पी.रोड, भाईदर (पुर्व)** | **रु. ६९,५०,०००/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख पन्नास हजार मात्र)** |
| ३ | | श्री. प्रेमकुमार चौहान, ७०४, ओम शिवदर्शन टॉवर, ९० फूट रोड, भाईदर (प.) | रु. ४१,००,०००/- (अक्षरीरु. एकेचाळीस लाख मात्र) |
| ४ | | श्री. देविदास जयदेव किणी, १०२, एकविरा अपार्टमेंट, राममंदिर समोर,भाईदर (प.) | रु. ६८,००,५५१/-(अक्षरी रु. अडसष्ट लाख पाचशे एकावन्न मात्र) |
| ५ | | श्री.चिंतामण गोपाळ आव्हाड, ए/१०३,सरयु,प्रभाग संकुल,दहिसर टोल नाक्याजवळ, दहिसर(पुर्व) मुंबई-४०० ०६८. | रु. ६८,१०,०००/- (अक्षरी रु. अडसष्ट लाख दहा हजार मात्र) |
| ६ | | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, शॉप नं.१, गजानन प्रसन्न अपार्टमेंट, भाईदर (प.) | निविदेत रक्कमेचा उल्लेख नाही (कोरी निविदा). |
| ७ | | श्री. पॅट्रीक जोजफ रॉड्रीक्स, २०२,स्टार पॅलेस,स्टेशन रोड,भाईदर (प.) | रु. २६,०००/- (अक्षरी रु. सव्वीस हजार मात्र) |
| ८ | | श्री. संदीप विश्वनाथ सावंत, सी/११०, गजानन प्रसन्न अपार्टमेंट, फाटक रोड, भाईदर (प.) | रु. ६८,५०,०००/- (अक्षरी रु. अडसष्ट लाख पन्नास हजार मात्र) |
| ९ | | श्री. ललित मनोहर राणे, २१५/२१६, गंधर्वराज अपार्टमेंट, खारीगाव, भाईदर(पुर्व) | रु. ४०,१०,१०१/- (अक्षरी रु. चाळीस लाख दहा हजार एकशे एक मात्र) |
| | **विभाग व देकारांची किमान रक्कम** | **निविदा धारकांचे नांव व पत्ता** | |
| १ | उत्तन देकारांची किमान रक्कम रु. १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) | **या विभागाकरिता एकही निविदा प्राप्त झाली नाही.** | ------------- |

**भाईदर (पुर्व)** विभागातील बाजार फी वसुली बाबत किमान देकाराची रक्कम रु. ८७,००,०००/- होती. प्राप्त झालेल्या निविदापैकी निविदा धारक श्री. संदीप विश्वनाथ सावंत यांची निविदा सर्वात जास्त दराची (रु. ८७,५०,०००/-) असल्याने निविदा स्विकृतीच्या वेळी त्या विभागांतील बाजार फी वसुलीचा ठेका त्यांना मंजुर करण्यात आला होता. परंतु निविदा धारक श्री. संदीप विश्वनाथ सावंत यांनी दि. २४/०३/२००५ रोजी महानगरपालिकेस अर्ज देउन निविदेत भरलेली देकारांची रक्कम एक वर्षाच्या मुदतीमध्ये व ठेक्याबाबतची अनामत रक्कम भरणे शक्य होणार नाही या कारणास्तव आपली निविदा मागे घेत आहोत असे महानगरपालिकेस कळविले आहे. यामुळे भाईदर (पुर्व) विभागात बाजार फी वसुली बाबत वृत्तपत्रांत जाहीरात देउन पुन्हा निविदा मागविणे क्रमप्राप्त झाले आहे. यामुळे निविदा सादर करते वेळी निविदा धारक श्री. संदीप विश्वनाथ सावंत यांनी डिमांड ड्राफ्ट व्दारे भरणा केलेली इसारा रक्कम रु. ८७,०००/- जप्त करुन महानगरपालिकेच्या निधीत जमा करणे तसेच सदर ठेकेदारांस काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यांत यावी तसेच सदर ठेकेदारांवर को-या भारतीय दंड संहितेमधील संबंधित विषयाबाबत असलेल्या कलमान्वये कारवाई करावी. को-या निविदा धारकांवर नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यांत यावे.

:- **भाईदर (पश्चिम)** विभागातील बाजार फी वसुली बाबत किमान देकाराची रक्कम रु. ८५,००,०००/- होती व प्राप्त झालेल्या ५ निविदापैकी एकही निविदेतील रक्कम किमान देकारापेक्षा जास्त नसल्याने त्या विभागातील बाजार फी वसुली बाबत पुन्हा वृत्तपत्रांत जाहीरात देउन निविदा मागविण्यात मंजुरी देण्यात येत आहे.

:- **मिरारोड ते चेणा-वरसावे** विभागातील बाजार फी वसुली बाबत किमान देकाराची रक्कम रु. ६८,००,०००/- इतकी होती. प्राप्त झालेल्या निविदापैकी निविदा धारक श्री. अब्दुल रेहमान एच. खान यांची निविदा सर्वात जास्त व किमान देकारापेक्षाही जास्त दराची (रु. ६९,५०,०००/-) असल्याने त्या विभागातील बाजार फी वसुलीचा ठेका श्री. अब्दुल रेहमान एच. खान यांना रु. ६९,५०,०००/- इतक्या किंमतीत मंजुर आहे.

:- **उत्तन** विभागातील बाजार फी वसुली बाबत किमान देकाराची रक्कम रु. १०,००,०००/- इतकी होती. मात्र सदर विभागातील ठेक्याबाबत एकही निविदा प्राप्त न झाल्याने वृत्तपत्रात पुन्हा जाहीरात देउन निविदा मागविणेंस मंजुरी देण्यांत येत आहेत तसेच भाईंदर(पुर्व), भाईंदर (पश्चिम), उत्तन विभागाच्या सन २००४-२००५ वर्षात ठेका घेतलेल्या ठेकेदार यांना दि. ०१/०४/२००५ ते ३१/०४/२००५ एक महिन्याची मुदत वाढीस मंजुरी देण्यांत येत आहे. सन २००४-२००५ या वर्षातील मंजुर ठैका रक्कमेमध्ये १०% वाढ घेऊन ठेकेदारांना (भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम) व उत्तन विभागातील ठेकेदार), मुदत वाढ देण्यांत यावी.

ज्या ठिकाणी महानगरपालिकेने बाजार फी वसुली करिता मनाई केलेली आहे त्या ठिकाणची वसुली ठेकेदारांनी केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास, सदर ठेकेदाराने महानगरपालिकेत त्वरित भरणा करण्याचे संबंधितांना बंधनकारक राहील.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, पहिला विषय सुरू असताना मी विषय काढला होता ठेकेदारांचा, त्यावेळी ठेकेदारांनी आपल्या सभागृह नेत्यांना बाहेर काढले व नगरसेवकांना फॉर्म घेवून दिले नाही, नक्की काय आहे?

**मा. सभापती :-**

माझ्याकडे अशी माहिती नाही.

**गजानन भोईर :-**

असे झाले होते.

**कैलासबेन जानी :-**

नरेंद्र मेहता आणि सभागृह नेते ह्यांना आतमध्ये जावू दिले नाही.

**मा. सभापती :-**

प्रशासनाला याबाबत माहिती असेल तर ती त्यांनी सभागृहातील सदस्यांना द्यावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग, त्यादिवशी काय झाले? त्यादिवशी महानगरपालिकेत पोलीस आले होते.

**कैलासबेन जानी :-**

सभागृह नेत्यांना देखील तिथपर्यंत जावू दिले नाही, ते परत गेले.

**मा. सभापती :-**

अशापद्धतीची माहिती प्रशासनाकडे आहे का? उपायुक्त साहेबांनी याबाबत खुलासा करावा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

पोलीस स्टेशनकडून फक्त बंदोबस्त मागवला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण बंदोबस्त का मागवला होता?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

जास्त गर्दी होत होती आणि सर्वांना निविदा फॉर्म उपलब्ध व्हाव्यात यासाठी पोलीस बंदोबस्त मागवला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निविदा फॉर्म कोणाला उपलब्ध होत नव्हत्या?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपण माझी उलट तपासणी करू नका.

**गजानन भोईर :-**

साहेब, हे आम्ही डोळ्यांनी पाहिले आहे.

**कैलासबेन जानी :-**

येथे ठेकेदारांची मनमानी चालू आहे. हे युनियनवाले महानगरपालिकेत इंटरफेर करतात, सभागृह नेत्याचा मान ठेवत नाही. युनियन करणार म्हणजे त्याच ठेकेदारांना ठेका दिला पाहिजे असे आहे का, त्यांनी पूर्ण महानगरपालिका खरेदी केली आहे का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

यात महानगरपालिकेचे नुकसान आहे. तुम्ही युनियन करून, युनियन तुमची बाहेरची आहे. ह्या युनियनमुळे बाहेरचे जे चांगले ठेकेदार आहेत त्यांना बंदी होईल. सेंटिग होवून त्यात महानगरपालिकेचे नुकसान होईल आणि काम निकृष्ठ दर्जाचे होईल. त्यांची युनियन झाल्यामुळे ते वाटेल ते आमच्याशी करतात, एवढी जर त्यांची मजल जाते....

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी, मगाशी खुलासा घेतल्यानंतर ज्यावेळेला महापालिकेमध्ये आम्ही असताना स्वतः आयुक्त साहेब चौथ्या माळयावर ज्या ठिकाणी पावती मिळते तिथे हजर होते आणि सर्वांना निविदा फॉर्म मिळावे असे करून दिले व कोणालाही मज्जाव करू दिला नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांनी दिले, पण गेल्या वेळेला स्थायी समितीत काढले होते त्या ठेकेदारांची किती मजल झाली होती.

**मा. सभापती :-**

पण तो आताचा विषय नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मला एवढेच सांगायचे आहे, जर एवढी दादागिरी चालत असेल तर जेवढे त्या संघटनेचे सभासद ठेकेदार आहेत त्यांना सरळ ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे. त्यांना एकही ठेका द्यायचा नाही.

**मा. सभापती :-**

आपले जर असे निर्दशनात आले तर.

**जोजफ घोन्सालवीस :-**

होय, ते झाले आहे.

**मा. सभापती :-**

ते कागदोपत्री निर्दशनात येवू दे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पोलीस संरक्षण मागवावे लागले. अशी घटना कधीच झाली नव्हती मग आता का आली?

**कैलासबेन जानी :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता आणि इतर चारजण असे एकत्रित येवून आयुक्त साहेबांच्या कॅबिनमध्ये गेले, तेव्हा आयुक्त साहेब चौथ्या माळ्यावर जावून बसले.

**मा. सभापती :-**

म्हणजे त्याच्यावर नियंत्रण पूर्ण इम्प्लीमेन्टेशन झाले आणि असे पुढे होणार नाही याची खबरदारी आयुक्त साहेबांनी म्हणजेच प्रशासनाने घेतली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा जो मोठा धोका आहे त्याने आपल्या महानगरपालिकेला नुकसान आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७२ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, ह्या विषयासंर्दभात गोषवारा जो प्रशासनाने सादर केलेला आहे, तर आयुक्त साहेब रजेवर आहेत का?

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेबांची ओरिजनल पत्रावर सही आणि स्वाक्षरी मी स्वतः बघितलेली आहे आणि जेव्हा आयुक्त साहेब हजर नव्हते त्यावेळी श्री. शेख उपायुक्त साहेबांनी सही केली होती आणि ओरिजनल कागदावर आयुक्त साहेबांची सही आहे.

**अशोक पाटील :-**

सही आहे का?

**मा. सभापती :-**

होय, मी स्वतः बघितले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, ही एकूण जमिन किती आहे?

**प्र. सचिव :-**

याबाबतीत प्रशासन खुलासा करेन, सचिव खुलासा करू शकत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

प्रशासनाने खुलासा करावा की, ही एकूण जमिन किती आहे. हा जो प्रकल्प आहे, तो आम्ही नाशिकला बघून आलो, तो काहीतरी सतरा एकर जमिनीमध्ये झाला आहे. त्याचे जे कुंपन त्याची अट घातली आहे ते सतरा एकरा जागेमध्येच कुंपन घातले आहेत. आपण जरी येथे ८४ लाख रूपये पास केले होते, संपूर्ण जागेला कंपाउन्ड घालण्यासाठी. आता तिथे आजुबाजूला अतिक्रमण आहे. उद्याला ते ॲडव्हास पझेशनने दावा करू शकतात की, ही जमिन माझी आहे. दहा वर्षाच्या कालावधीकरिता आपण ठेक्याने देत आहोत आणि काय गॅरंटी आहे की, आजुबाजूला जी अतिक्रमण आहेत ते उद्याला काही करणार नाही, कारण त्याला भिंत बांधल्याशिवाय हा प्रकल्प चालू करू नये असे आमचे मत आहे.

**मा. सभापती :-**

कुंपनाची भिंत आणि रस्ता हे पास केले आहे ते हे काम झाल्याशिवाय होणारच नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तिथे जी वस्ती आहे ती विखुरलेली वस्ती आहे आणि त्यावेळेला आयुक्त साहेबांनी मा. महासभेत सांगितले होते की, त्यांना चारशे बाय चारशे मीटरचा असा प्लॉट देवून त्याच्यामध्ये ती सगळी वस्ती एकत्रित वसवू आणि त्याच्यानंतर पुढचा प्रकल्प आम्ही सुरू करू. आता जर तिथे बघितले तर सगळी वस्ती ही विखुरलेली आहे आणि तिथे लाईटची सोय केली आहे.

**मा. सभापती :-**

त्या जागेवर मी, नामदार वसंत डावखरे साहेब आणि प्रशासकीय सर्व अधिकारी, पदाधिकारी जेव्हा जावून आलो तेव्हा विखुरलेली वस्ती आणि असलेला ओपन प्लॉट ह्याच्यामध्ये फार मोठी तफावत आहे. तिथे आपल्याला पूर्णपणे प्लॉट मिळतोय आणि तेथून खाली जाताना आपल्याला वस्ती लागते आणि वरचे जे संपूर्ण पठार आहे तो पूर्ण ओपन पठार आपल्याकडे आहे म्हणजे जे झोपडपट्टीचे आहे ते कुठेही आपल्याला बाधित असे नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, आम्ही ते सगळे एकत्रित करू.

**मा. सभापती :-**

आपण जे बोलता ते बरोबर आहे. आपण आपले जे मत मांडले आहे त्या मताविषयी बोलतो की, जी विखुरलेली झोपडपट्टी आहे आणि जो जो प्लॉट आपल्याला संपूर्णपणे मिळाला आहे आणि विखुरलेली झोपडपट्टी ही पाच ते दहा टक्क्यांमध्ये असेल त्या प्लॉटच्या अन्यथा ९० टक्के प्लॉट टोटल ओपन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपले काय मत आहे, की ते १० टक्के सगळी विखुरलेली झोपडपट्टी आहे त्यांना ती द्यायची का, की ठराविक एरियामध्ये त्यांना वसवायचे आहे. कारण त्यावेळेला मा. महासभेत सांगितले होते की, ठराविक त्यांना एरिया देवून त्यांना वसवायचे, त्यांना घरकुलासारखे घर बांधून द्यायचे.

**मा. सभापती :-**

म्हणजे तिथे आपली लोक आहेत?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपलीच लोक आहेत, मिरा भाईंदरचे रहिवाशी आहेत ते आपलेच झाले ना!

**मा. सभापती :-**

आपले लोक असतील तर आपण त्यांचे नावासहित शिफारस करा, ही आपली लोक आहेत आणि त्यांचे पुर्नवसन केले पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पुर्नवसन नाही. आपण तिथे प्रकल्प सुरू करतोय, तिथे घाणीचा प्रकल्प आहे आणि त्यांना बाधा होवू नये म्हणून त्यांना एका ठिकाणी जागा द्यावे. कारण सरतेशेवटी ते आरोग्याला धोकादायक आहे.

**मा. सभापती :-**

१९९५ च्या अगोदरची जी लोक असतील त्यांना आपण कुठेही बाधित होवू देणार नाही. त्यांना पूर्णपणे संरक्षण देण्यात येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांच्या आरोग्याचे काय?

**मा. सभापती :-**

त्याला पोल्युशन बोर्डाची परवानगी आहे आणि त्यांच्या आरोग्याला धोका होवू शकत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझे म्हणणे असे आहे की, जी वस्ती आहे त्या वस्ती सभोवताली जर भिंत वगैरे किंवा उंच असे केले तर जो निघणारा वायु आहे त्याने त्यांना धोका होणार नाही.

**मा. सभापती :-**

पोल्युशन बोर्ड एखाद्या प्रोजेक्टची संपूर्णपणे एन.ओ.सी. देते. ना-हरकत, तर ते आपण का मागतो की तिथे आजुबाजूला वसलेली माणसांची जी वस्ती असेल त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होवू नये म्हणून प्रदूषण बोर्डाची परवानगी मागितली जाते असे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे तिथल्या वस्तीचे झाले आणि आपण मा. महासभेत ५० टनाचे फक्त आणि येथे १००/१२५ टनाचे सांगायला लागलात.

**मा. सभापती :-**

५० टनच आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, उत्तन आणि पाली याठिकाणी आपली एकूण ३१.४६ हेक्टर जमिन आहे. या जमिनीमध्ये खतप्रकल्प सुरू करण्यासाठी मा. महासभेचा ठराव झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पूर्ण विभागासाठी आपण प्रस्ताव पाठवला होता. परंतु, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या जागेची पाहणी केल्यानंतर त्यांनी फक्त ५० टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प राबवून खत घेवून प्रकल्प सुरू करावा यासाठी आपल्याला परवानगी दिलेली आहे. त्यांनी त्यावेळेला भेट देताना, त्या ठिकाणचा संपूर्ण सर्व्हे केलेला आहे, वस्तीची पाहणी केलेली आहे, तिथल्या हवेचे सॅम्पल घेतलेले होते, हे संपूर्ण त्यांनी तपासणी करुन आपण २५० टनासाठी परवानगी मागितली

होती पण त्यांनी फक्त ५० टनासाठी परवानगी दिलेली आहे आणि आताची जी निविदा आहे ती फक्त ५० टनासाठी आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

गोषवा-यामध्ये असा उल्लेख केला आहे शंभर ते सव्वाशे टनाचा.

**डॉ. बावस्कर :-**

निविदाकार तयार आहेत परंतु, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मी खाली लिहिलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्यावर प्रदुषण नियत्रंण बोर्डाची तुम्ही परवानगी घेतल्याशिवाय असे पत्र.

**डॉ. बावस्कर :-**

आपण पत्र पाठवलेले नाही. प्रदुषण नियत्रंण मंडळाची मंजुरी घेतल्याशिवाय आपण कुठल्याही प्रकारचे काम त्या ठिकाणी करत नाही. प्रदुषण नियंत्रण मंडळाची मंजुरी फक्त पन्नास टनासाठी आहे. हा मुद्दा जो आहे हा एवढ्यासाठी त्याठिकाणी टाकलेला आहे की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील संपूर्ण .....

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुमच्याकडे आता पोल्युशन बोर्डाची परवानगी आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

होय, परवानगी आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मला त्याची झेरॉक्स देण्यात यावी.

**डॉ. बावस्कर :-**

आपणांस झेरॉक्स देण्यात येईल आणि हा खत प्रकल्प फक्त ५० टनासाठी आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

निविदा ५० टनाची काढली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निविदा ५० टनाची आहे पण त्यांनी लिहिले आहे १०० ते १२५ असे.

**मिलन पाटील :-**

तेवढी त्यांची क्षमता आहे.

**डॉ. बावस्कर :-**

ते तेवढी क्षमता ठेवू शकतात.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी मा. महासभेला ज्यावेळेला हा विषय आला त्यावेळी आपण प्रायोगिक तत्वावर ५० टनाला मंजूरी दिलेली आहे. प्रायोगिक तत्व कशाला म्हणतात? ते झाल्यानंतर जर आवश्यकता वाटली तर मा. महासभेपुढे परत तो विषय येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

म्हणूनच सांगतो, आजुबाजूला आमची वस्ती आहे, तिथे जनावरं राहत नाहीत.

**हॅरल बोर्जीस :-**

वस्तीचा विचार करूनच प्रदुषण नियंत्रण मंडळाने एवढी मंजुरी दिली आहे.

**डॉ. बावस्कर :-**

विषय आपल्यासमोर येणारच आहे. आपल्या मंजुरीशिवाय काही होणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझा ह्याला निषेध आहे आणि विरोध ही आहे.

**मा. सभापती :-**

आपला विरोध असेल तर आपण आपला विरोध नोंदवावा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

भिंत त्याला झालीच पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपण ह्याला विरोध नोंदवता आणि पुन्हा खबरदारी घ्यायला पण सांगता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ती जागा तेवढी आहे जर भिंत बांधली नाही तर ती जागाही जाईल. माझा विरोध ह्या प्रक्रियेला आहे कारण ती जागा जाईल आणि अतिक्रमणात ती सगळी जागा ते खावुन टाकतील. तसाच जर तुमचा उद्देश असेल तर.... या ठरावाला माझा वैयक्तिक विरोध आहे. माझ्या गावकऱ्यांच्या वतीने माझा विरोध आहे, पक्षाच्या वतीने नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १७२ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**मा. सभापती :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, सभापती साहेब डायसवरून अनुमोदन देवू शकतात का?

**प्र. सचिव :-**

अनुमोदन देवू शकतात.

**प्रकरण क्र. १७२ :-**

उत्तन व पाली येथील जागेत ५० टन जैविक विघटन होणाऱ्या घन कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प सुरू करणेबाबत.

**ठराव क्र. १८६ :-**

मा. महासभा ठराव क्र. ३५ दि. २०/११/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील मौजे पाली सर्वे नं. ६५ (४८) व मौजे उत्तन सर्वे नं. २५ अशा एकुण ३१ हेक्टर ४६ आर जागेत घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० नुसार विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी तसेच पुर्ननिर्माण न करता येणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने जमिन पुर्नभरण करणेसाठी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी दिलेली आहे. उपरोक्त मौजे पाली व उत्तन येथील जागेत घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणे व जमिन पुर्नभरणसाठी परवानगी देणे बाबत दि. ४/१/२००३ अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडे अर्ज करण्यात आला होता. त्यानुसार No. Bo/ MSW NB - 2675 दि. २७/८/२००४ अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने उपरोक्त निर्देशित जागेत जैविक विघटन होणाऱ्या ५० टन घनकचऱ्यावर प्रक्रीया प्रकल्प उभारणेसाठी मंजूरी दिलेली आहे.

मा. महासभा दि. ६/११/२००४ ठराव क्र. ४७ अन्वये मौजे पाली व उत्तन येथील जागेत ५० टन क्षमतेचा जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती प्रकल्पास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे.

सदर जागे करीता दि. २७/८/२००४ रोजी महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून जागेची भौगोलिक परिस्थिती विचरात घेता महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकुण २६० टन पैकी फक्त ५० टन जैविक विघटन होणाऱ्या घनकचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून अथोरायझेशन प्राप्त झालेले आहे. अथोरायझेशननुसार मौजे पाली व उत्तन येथे प्रती दिन ५० टन क्षमतेचा घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाटीसाठी खत प्रकल्प राबवणे करीता निविदा मागविण्यात आल्या आहेत.

विहित मुदतीत ५० टन क्षमतेचा खत प्रकल्प उभारणे खालील दोन निविदाकारांनी निविदा भरलेल्या आहेत.

मे. ग्रीन गोल्ड एनर्जी

मे. मार्तंड बायो इंजीनिअरींग कंपनी

**ग्रीन गोल्ड एनर्जी :-**

ग्रीन गोल्ड एनर्जी यांनी ॲरोबीक कंपोस्टींग तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प सादर केलेला आहे. ग्रीन गोल्ड एनर्जी यांनी निविदेचा संपूर्ण तांत्रिक तपशिल आवश्यक असणारी उपकरणे, साहित्य इत्या बाबतचा संपूर्ण तपशिल निविदेत दिलेला आहे. ग्रीन गोल्ड एनर्जी हे घनकचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्पात घनकचऱ्यावर प्रक्रियासाठी पंजाबराव कृषी विद्यापिठ, अकोला यांनी तयार केलेले बायोकल्चर वापरणार आहेत.

